महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. २५ मार्च २०२६

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ११६ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

उद्धव ठाकरे साहेब यांना खूप खूप शुभेच्छा

एकनाथ शिंदेंनी विधान परिषदेत दिला निरोप; नीलम गोऱ्हे, अमोल मिटकरींचेही केले कौतुक

उद्धव ठाकरेंविषयी काय म्हणाले शिंदे?

एकनाथ शिंदे म्हणाले, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा या सदनाचे सदस्य उद्धव ठाकरे साहेब हे आज विधान परिषदेचा निरोप घेत आहेत. त्यांना निरोगी दुर्घायुष्य लाभो अशा मनापासून शुभेच्छा देतो. तसेच त्यांना पुढील राजकीय वाटचालीसाठी देखील खूप खूप शुभेच्छा देतो.

नीलम गोऱ्हेंचा फायर ब्रँड नेत्या म्हणून उल्लेख

एकनाथ शिंदे यांनी यावेळी उपसभापती नीलम गोऱ्हे यांचा उल्लेख शिवसेनेच्या फायर ब्रँड नेत्या असा केला. ते म्हणाले, आमच्या शिवसेनेच्या फायर ब्रँड नेत्या नीलम गोऱ्हे आज निवृत्त होत आहेत. त्या मागील 24 वर्षांपासून या सभागृहात आहेत. रा.सू. गवई साहेब सलग 30 वर्षे या सभागृहाचे सदस्य होते. त्यानंतर वि. स. पागे यांच्याकडे या सभागृहाचा 24 वर्षे सदस्य राहण्याचा मान आहे. त्यांच्या विक्रमाची बरोबरी नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. एक महिला म्हणून उपसभापती पदावर राहण्याचा विक्रमही त्यांच्या नावावर आहे. उपसभापती म्हणून अत्यंत कणखरपणे, शिस्तबद्ध काम करून या वरिष्ठ सभागृहाचा सन्मान वाढवला. त्याचे पावित्र्य व लौकिक वाढवला.

मुंबई : (समर्थ गांवकरी)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह विधान परिषदेतील 9 सदस्य आज आपला कार्यकाळ संपल्यामुळे निवृत्त झाले. त्यांना निरोप देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंचा उल्लेख 'उद्धव ठाकरे साहेब' असा केला. यावेळी त्यांनी त्यांना निरोगी दुर्घायुष्य लाभण्याच्या व पुढील राजकीय वाटचालीसाठी मनापासून शुभेच्छा दिल्या. शिवसेनेतील फुटीनंतर शिंदेंनी प्रथमच ठाकरेंना अशा शुभेच्छा दिल्यात. त्यामुळे त्यांच्या शुभेच्छांची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

एकनाथ शिंदे आपल्या भाषणात म्हणाले, विधानपरिषदेचे 9 सदस्य आज आपला कार्यकाळ पूर्ण झाल्यामुळे निवृत्त होत आहेत. गेल्याच आठवड्यात राज्यसभेचे काही सदस्य निवृत्त झाले. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की, राजकारणात पूर्णविराम कधीच नसतो. सदस्य राज्यसभेतून निवृत्त झाले तरी त्यांचे जनजीवन संसदेच्या कक्षेबाहेरही निरंतर सुरू असते. त्याच धर्तीवर आज विधानपरिषदेतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांचे कार्य यापुढेही निरंतर पुढे सुरू राहील याची मला खात्री आहे.

थोडक्यात...

महाराष्ट्रात चार प्रांतांऐवजी संघाचे होणार सात विभाग

नागपूर (समर्थ गांवकरी) : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रचारक रचनेत बदलांना मान्यता मिळाली असून आता प्रांताऐवजी विभागनिहाय प्रचारक राहणार आहेत. यानुसार महाराष्ट्रात आता चार प्रातांऐवजी सात विभागांत कामाचे विभाजन होणार आहे. पुढील वर्षभरात नेमकी रचना निश्चित करुन ती बदलविण्यात येणार आहे. सोबतच पुढील वर्षभर देशभरात संघशाखांच्या वाढीवरदेखील भर देण्यात येणार असल्याची माहिती विदर्भ प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार यांनी दिली. समालखा येथे झालेल्या संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेबाबत त्यांनी मंगळवारी पत्रपरिषदेत माहिती दिली. यावेळी संघाचे प्रांत कार्यवाह अतुल मोघे, महानगर कार्यवाह रविंद्र बोकारे, महानगर प्रचारप्रमुख ब्रजेश मानस उपस्थित होते. सद्यस्थितीत पश्चिम क्षेत्रात महाराष्ट्र-गुजरात-गोवा या राज्यांचा समावेश होतो व त्यात एकूण सहा प्रांत आहेत. मात्र नवीन रचनेनुसार गुजरातमध्ये तीन विभाग असतील तर महाराष्ट्रात एकूण सात विभाग असतील.

आखाती युद्धाचा फटका शेतकऱ्यांना

गोंदिया (समर्थ गांवकरी) : आखाती देशात सुरु असलेल्या युद्धामुळे पेट्रोल, डिझेल व गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. खत निर्मितीसाठी कारखान्यांना आवश्यक असलेला गॅस पुरवठा होत नसल्याने खत निर्मितीवर परिणाम झाला आहे. त्यामुळेच मागील पंधरा दिवसांपासून युरियासह इतर खतांचा पुरवठा ठप्प झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील रब्बी धान उत्पादक शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. गोंदिया जिल्ह्यात खरीप हंगामापाठोपाठ रब्बी हंगामात सुद्धा 65 हजार हेक्टरवर धानाची लागवड केली जाते. यासाठी युरिया, डीएपी व मिश्र खतांची मागणी असते. त्यासाठी जिल्हा कृषी विभागाने रब्बी हंगामासाठी खतांचे नियोजन केले होते. रब्बी हंगामासाठी एकूण 81 हजार 237 मेट्रिक टन खताची मागणी केली होती.

अजित पवार अपघात प्रकरणी कर्नाटकात FIR दाखल

रोहित पवार यांच्या लढ्याला यश, बंगळुरू पोलिसांत विमान कंपनीविरुद्ध गुन्हा

मुंबई : (समर्थ गांवकरी)

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाती निधनावरून महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या संशयाचे मोहोळ उठले आहे. या प्रकरणाचा पाठपुरावा करणाऱ्या आमदार रोहित पवार यांच्या संघर्षाला मोठे यश आले असून, तब्बल दोन महिन्यांनंतर या प्रकरणी अखेर गुन्हा दाखल झाला आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्र पोलिसांनी टाळाटाळ केल्यानंतर कर्नाटकची राजधानी असलेल्या बंगळुरू येथील शेशाद्रीपुरम पोलीस ठाण्यात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १७३(१) अंतर्गत 'झिरो एफआयआर' (Zero FIR) नोंदवण्यात आला आहे.

२८ जानेवारी २०२६ रोजी बारामती विमानतळाजवळ 'लियरजेट ४५' (VT-SSK) हे विमान कोसळले होते. यामध्ये अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला होता. रोहित पवार यांनी आपल्या तक्रारीत हा केवळ अपघात नसून एका मोठ्या गुन्हेगारी कटाचा भाग असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. विमानाच्या देखभालीत (Maintenance) आणि संचालनात जाणीवपूर्वक निष्काळजीपणा करण्यात आल्याचा दावा तक्रारीत आहे. विमानाचे तांत्रिक रेकॉर्ड्स आणि उड्डाण तासांच्या नोंदींमध्ये फेरफार करून बनावट कागदपत्रे तयार केल्याचा आरोप रोहित पवारांनी केला आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, अपघातग्रस्त विमानाने अधिकृत नोंदींमध्ये ४९१५ तास पूर्ण केल्याचे दाखवले होते, जे ५००० तासांच्या अनिवार्य इंजिन 'ओव्हरहॉल' (TBO) मर्यादेच्या अगदी जवळ होते. मात्र, प्रत्यक्षात या विमानाने ८००० तासांहून अधिक उड्डाण केले असावे, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (DGCA) २४ फेब्रुवारीच्या ऑडिट अहवालातही 'VSR व्हेंचर्स' कंपनीची काही विमाने उड्डाणासाठी अयोग्य असल्याचे सांगत ती ग्राऊंड केली होती. तरीही हे विमान वापरासाठी का ठेवले? असा टोकदार प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

भोंदूगिरीचा पंचनामा करण्यासाठी अंनिस सज्ज

मुंबई : (समर्थ गांवकरी)

नाशिकच्या अशोक खरात प्रकरणामुळे राज्य हादरलेले असतानाच, आता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) भोंदूगिरीच्या समूळ उच्चाटनासाठी कंबर कसली आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील प्रभावशाली आणि शोषणकारी भोंदू बाबांची यादी पुराव्यासह पोलीस प्रशासनाला सादर करण्याचा निर्णय अंनिसने घेतला आहे. यासंदर्भात सोमवारी (२३ मार्च) अंनिसच्या शिष्टमंडळाने राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन दिले. सामान्य नागरिक व पीडित व्यक्ती या बुवा बाबांकडून होणाऱ्या शोषणासंदर्भात अंनिस कार्यकर्त्यांशी संपर्क साधत असतात. प्रत्येक जिल्ह्यातील अशा प्रमुख शोषणकारी भोंदू बाबांची यादी व शक्य असेल तेथे यासंदर्भातील पुरावे असलेला पेन ड्राईव्ह अंनिसचे कार्यकर्ते जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या सुपूर्त करणार आहेत. अंनिसच्या राज्य कार्यकारी समितीचे सदस्य मुक्ता दाभोलकर, राजीव देशपांडे, गणेश चिंचोले यांनी आज दिनांक 23 मार्च रोजी महाराष्ट्राचे पोलिस महासंचालक सदानंद दाते यांची भेट घेऊन त्यांना यासंदर्भातील निवेदन दिले.

दादांच्या घराबाहेर काळी जादू, अनेक नेत्यांनी करंगळी कापली

मुंबई : (समर्थ गांवकरी)

"महाराष्ट्रात राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या मृत्यूला दोन महिने उलटूनही पोलिस एफआयआर दाखल करत नाहीत, हे दुर्दैव आहे. अखेर राहुल गांधींच्या सल्ल्यानुसार आम्ही कर्नाटक गाठले आणि तिथे 'झिरो एफआयआर' नोंदवून तो राज्याच्या पोलिस महासंचालकांकडे वर्ग केला आहे," अशी माहिती आमदार रोहित पवार यांनी दिली. यावेळी त्यांनी अजित पवार जिवंत असताना त्यांच्या घराबाहेर 'काळी जादू' करण्यात आली होती आणि काही नेत्यांनी आपली करंगळी कापली होती, असा धक्कादायक दावा करून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या तपासाबाबत रोहित पवार यांनी सरकारला धारेवर धरले. "आम्ही मरीन ड्राईव्ह, बारामती पोलिस आणि सीआयडीकडे वारंवार खेटे घातले, पण गुन्हा नोंद झाला नाही. साधी चप्पल चोरीला गेली तरी एफआयआर होतो, मग राज्याच्या नेत्याच्या बाबतीत इतकी दिरंगाई का? आम्ही राहुल गांधींना भेटलो, ते म्हणाले ज्या राज्यात न्याय मिळू शकतो अशा राज्यांत जावा, गवई साहेबाचे उदाहरण आहे. कर्नाटकात दादांच्या अपघातानंतर गुन्हा दाखल झाला, मी त्या राज्याचे आभार मानतो. मी फक्त कर्नाटकात गेलो, तिथे एका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून ०० ने तो तपासासाठी महाराष्ट्राकडे पाठवला आहे."

ऐसी कौनसी बात थी, किसी और का हाथ पकडना पडा

उद्धव ठाकरेंचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना 'शायराना' सवाल

मुंबई : (समर्थ गांवकरी)

"राजकारण हा माझा पिंड नाही, माझा मूळ स्वभाव हा कलाकाराचाच आहे. मुख्यमंत्री महोदय, तुम्ही माझे इतके उत्तम वर्णन केले, मला इतके जवळून ओळखले, मग 'ऐसी कौनसी बात थी, की और किसी का हाथ पकडना पडा'," अशा शब्दांत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शायरीला 'शायरी'नेच उत्तर दिले. विधान परिषदेतील ९ सदस्यांचा कार्यकाळ संपत असल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित निरोप समारंभात उद्धव ठाकरे यांची फटकेबाजी आणि राजकीय टोलेबाजी पाहायला मिळाली. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळातील आठवणींना उजाळा देताना उद्धव ठाकरे म्हणाले, उद्धव ठाकरे म्हणाले, मी या विधीमंडळात मुख्यमंत्री म्हणून आलो होतो. काही गोष्टी आयुष्यात अशा घडतात की आपल्या ध्यानीमनी नसते आणि अचानक ती जबाबदारी येते. जबाबदारी आल्यानंतर त्यातून पळ काढणे हे मर्दाचे लक्षण नसते. त्यामुळे ती जबाबदारी स्वीकारली. मला सगळ्यांना धन्यवाद द्यायचे आहेत. सर्व माझे त्यावेळचे आजी-माजी सहकारी, मंत्रिमंडळात होते. सगळे शासकीय अधिकारी, सर्व प्रशासन, सर्व अधिकाऱ्यांपासून कर्मचाऱ्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. कारण एक प्रशासनाचा गंधही नसणारा माणूस अचानक राज्याच्या मुख्यमंत्री पदावर बसतो आणि तो राज्य चालवतोय. हे या सगळ्यांच्या सहकार्याशिवाय शक्य झाले नसते. उद्धव ठाकरे म्हणाले, मुख्यमंत्री महोदय आपण मला निरोप देण्यासाठी स्वत: अगत्याने हजर राहिलात, त्याबद्दल मनापासून धन्यवाद. मला तो ही दिवस आठवला आणि त्या दिवसाची आठवण मी तुम्हाला करून देणार आहे. पण काल विधिमंडळात जे काही घडले ते बघून मला तो दिवस का आठवला ते सांगतो. कारण आपण म्हणाला होतात ज्ञानेश्वरांचे भारूड. काट्याच्या आणीवर वसली तीन गावे, दोन ओसाड एक वसई चिना, आता त्या गावची पाटीलकी आपल्याकडे आहे. आता ते आणीवरच्या तीन गावांमधील एक गाव आणीवर गेलेले आहे. बाकी गावांचे काय झाले? ते त्या गावकऱ्यांना माहिती आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, ज्ञानेश्वरांची आठवण आल्यानंतर एक गोष्ट आवर्जुन सांगावी वाटते की, ज्ञानेश्वर महाराज १२ व्या, १३ व्या शतकात होऊन गेलेले आहेत. त्यावेळेला ज्ञानेश्वरांनी रेड्याकडून वेद वदवून घेतले होते. त्या शतकापासून या शतकात आल्यानंतर स्वार्थासाठी रेडे कापले जातात. हा महाराष्ट्र कोणत्या दिशेने चाललेला आहे? आपले खालच्या सभागृहातील निवेदन मी काळजीपूर्वक ऐकले. नाशिकच्या प्रकरणाबाबत आपण जी भूमिका घेतली, त्यासाठी धन्यवाद देतो. उद्धव ठाकरे म्हणाले, सिनेकलावंत अतुल कुलकर्णी यांचे एक चांगले वक्तव्य आहे. पकडले जातात ते भोंदू, पण जे पकडले जात नाहीत त्या महाराजांचे काय करायचे? आपण सगळ्यांनी एकत्र मिळून एक भूमिका घ्यायला पाहिजे. सगळ्या राजकारणींनी ठरवले, तर बुवा शक्ती पेक्ष युवाशक्तीला आपण जास्त ताकद दिली पाहिजे.

पीडित महिला तक्रार देण्यासाठी कशा पुढे आल्या? मुख्यमंत्र्यांचे विधानसभेत निवेदन

अशोक खरातला कोणत्या पद्धतीने अटक झाली?

मुंबई : (समर्थ गांवकरी)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत भोंदू अशोक खरात याच्यावर करण्यात येणाऱ्या कारवाईविषयी सविस्तर निवेदन केले. त्यात त्यांनी अशोक खरातला कोणत्या पद्धतीने अटक झाली? या प्रकरणी पोलिसांनी कोणती खबरदारी घेतली? पीडित महिला खरात विरोधात तक्रार देण्यासाठी कशा पुढे आल्या? याविषयी विस्तृत माहिती दिली. "अशोक खरातने दैवी शक्तीचा खोटा दावा करून अनेक महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त केले आहे. आतापर्यंत त्याची ४० कोटींची मालमत्ता समोर आली असून, त्याने १३ देशांमध्ये प्रवास केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी अशोककुमार एकनाथ खरात या नावाने वावी पोलिस स्टेशन जिल्हा नाशिक येथे तक्रार दिली की, आरोपी दिनेश मनाजी परब याने त्याच्या मोबाईल क्रमांक ९८२२३००३८३ यावरून व्हॉट्सॲपद्वारे फिर्यादीचा मोबाईल क्रमांक ९३२२८६४४९ वर फिर्यादीचे व एका महिलेचे चार व्ह्यू वन्स स्वरूपात फोटो प्रसारित करून सदरचे फोटो हे समाजात व्हायरल करण्याची धमकी देऊन, ते व्हायरल न करण्यासाठी पाच कोटी रुपयांची खंडणी व्हॉट्सॲप कॉलद्वारे मागितली. सदरचे फोटो दिनेश परब याला राजेंद्र जासूद याने दिले आहेत. याबाबतची तक्रार दिली होती. यावरून वावी पोलिस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४६८/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०८-२ सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००६ चे कलम ६६ ई, ६७ अ प्रमाणे दाखल करण्यात आला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, सदर गुन्ह्याचा प्राथमिक तपास हा गुन्हे शाखा नाशिक ग्रामीण यांनी करून फिर्यादी अशोक खरात याचा मोबाईल सायबरकडून तपासणी केली, परंतु त्यात काही पुरावा आढळून आला नाही. तपासकामात फिर्यादी अशोककुमार खरात, दिनेश परब याच्यासोबत केलेले व्हॉट्सॲप मेसेजेस व स्क्रीनशॉट तपासकामी हजर केले व ते जप्त केले आहेत. त्याअनुषंगाने फिर्यादीने सांगितलेल्या फिर्यादीबाबतचा पुरावा आढळून आला नाही. आरोपी दिनेश परब यास मा. उच्च न्यायालयातून अंतरिम जामीन व राजेंद्र जासूद यास जिल्हा नाशिक येथून अटकपूर्व जामीन मंजूर आहे. नीरज जाधव याच्या सहभागाबद्दल आजपावेतो तपासात पुरावा आढळून आला नाही. त्याचा सहभागाबाबत तपास सुरू आहे. हा पहिला पार्ट आहे. ज्यात त्यांनी तक्रार केली होती. ज्यातून आपल्या लक्षात ही केस आली. देवेंद्र फडणवीस म्हणाले, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी शिर्डी येथे एका महिलेने तक्रार दिली की, तिला नीरज जाधव या व्यक्तीने व्हॉट्सॲपद्वारे तिचा एआय जनरेटेड अश्लील फोटो शेअर केला व लगेच डिलीट केला व तो व्हायरल करण्याची धमकी दिली, असा संशय व्यक्त केला. त्यावरून शिर्डी पोलिस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर १३१/२२६ बीएसएस २५१ २ सह आयटी ॲक्ट ६६ ई, ७६ अ प्रमाणे नीरज जाधव यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासात फिर्यादीने तिचा मोबाईल तपासकामी हजर केला नाही. तसेच तिला कोणत्या मोबाईल नंबरवरून मेसेज आला, तो ही तिला सांगता आला नाही. यातील आरोपी नीरज जाधव याचा शोध घेत असताना, अशोक खरात यांच्याशी संबंधित योगेश भालेराव या साक्षीदाराने काही व्हिडिओ तपास अधिकारी यांना दाखवले. त्या व्हिडिओमध्ये एकूण आठ महिलांचे ३५ व्हिडिओ असल्याचे समोर आले.

दिनेश दिवटेकरचे परीक्षेत यश

किनवट : (समर्थ गांवकरी)

भोकर येथील दिगंबरराव बिंदू महाविद्यालयाचा बी.एस्सी. तृतीय वर्षाचा विद्यार्थी दिनेश शंकर दिवटेकर याने IIT Bombay द्वारा घेण्यात आलेल्या फेब्रुवारी 2026 मध्ये झालेल्या JAM (Physics) या राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित परीक्षेत यश संपादन करून महाविद्यालयाच्या इतिहासात नवा अध्याय लिहिला आहे.

दिनेश हा अत्यंत कष्टाळू व जिद्दी विद्यार्थी असून, आपल्या गरिब कुटुंबाला हातभार लावण्यासाठी तो दररोज सकाळी भोकर शहरात वृत्तपत्र वितरणाचे काम करतो. तरीदेखील तो भौतिकशास्त्राच्या एकाही तासाला गैरहजर राहिला नाही, ही त्याच्या अभ्यासावरील निष्ठेची साक्ष आहे. महाविद्यालयातील

भौतिकशास्त्र विभागाने विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्यास आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक प्रयत्न करण्यास नेहमीच प्रेरित केले आहे. भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. भूपेश नेम्मानीवार, सहकारी प्रा. साईनाथ पांचाळ आणि प्रा. श्रीनिवास चव्हाण यांनी नियमित अध्यापना सोबतच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन,

परिश्रमाला यशाची साथ

अतिरिक्त वर्ग, नोट्स व सर्वतोपरी मदत दिली. या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फळ यंदा दिनेशच्या यशाच्या रूपाने 12 वर्षानंतर मिळाले आहे. B.S.C. च्या पहिल्या वर्षापासूनच दिनेशला भौतिकशास्त्र विषयाची आवड असल्याने त्याला JAM परीक्षेची ओळख करून देण्यात आली होती. त्यानंतर त्याने सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली. गेल्या १२ वर्षांपासून अनेक विद्यार्थी या कठीण आणि प्रतिष्ठित परीक्षेत यश मिळवण्याचा प्रयत्न करत होते; मात्र यंदा दिनेशने हे यश संपादन करून महाविद्यालयासाठी ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. या यशामुळे दिनेशला आता IITs व NITs सारख्या राष्ट्रीय दर्जाच्या संस्थांमध्ये शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार असून, हे महाविद्यालय साठी अभिमानाची बाब आहे. दिनेशची ही कामगिरी ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारी असून, "परिश्रम आणि जिद्द असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नाही" याचा उत्तम आदर्श आहे. दिनेश च्या या यशाने महाविद्यालयासाठी एक नवा मानदंड निर्माण केला आहे. संस्थेचे अध्यक्ष माधव पाटील किनाळकर साहेब व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी दिनेशचे अभिनंदन केले आहे.

स्वारातीम विद्यापीठात इंग्रजी संवाद कौशल्याचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

वर्क फ्रॉम होम आणि ऑफिसच्या व्यस्त आवर्तनात इंग्रजीत संवाद साधणे, लिहिणे आणि बोलणे सोपे करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील संवाद कौशल्य केंद्राने एक नवीन ब्लेंडेड (ऑनलाइन + ऑफलाइन) अभ्यासक्रम सुरू केला आहे. 'सर्टिफिकेट कोर्स इन इंग्लिश फॉर कम्युनिकेशन' या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थी, गृहिणी, कर्मचारी, अधिकारी व प्रशासकीय सहकाऱ्यांना सहजरित्या इंग्रजीचे व्यावसायिक प्रशिक्षण मिळेल, अशी माहिती विद्यापीठाचे प्र. कुलसचिव प्रा. ज्ञानेश्वर पवार यांनी दिली. एप्रिल ते जून दरम्यान चालणाऱ्या या तीन महिन्यांच्या (एकूण ६० तास) कार्यक्रमात ऐकणे, बोलणे, वाचन आणि लेखन (LSRW) या चारही कौशल्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

बारावी उत्तीर्ण असलेली कोणतीही व्यक्ती हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकते. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे म्हणजे औपचारिक आणि अनौपचारिक संभाषणात आत्मविश्वास निर्माण करणे, शब्दसंपत्ती वाढवणे आणि विश्लेषणात्मक विचारसरणी विकसित करणे. विशेषतः, स्पर्धा परीक्षा व व्यवसायासाठी हा अभ्यासक्रम उपयोगी ठरणार आहे. विविध ठिकाणच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मदतीने इंग्रजी शिकण्याची ही दुर्मिळ संधी आहे.

दैनंदिन व्यवहारात इंग्रजीचा प्रभावी वापर करून करिअरला गती देण्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल. इच्छुक उमेदवारांनी प्रा. दिलीप चव्हाण (संवाद कौशल्य केंद्र) यांच्याशी ९४२०६४१५१९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाद्वारे करण्यात आले आहे.

किनवट बाजार समितीत सोयाबीन चुकारे रखडले

चौकशीचे आदेश, घोटाळ्याची शक्यता

किनवट : (समर्थ गांवकरी)

किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीन खरेदीप्रकरणी शेतकऱ्यांचे चुकारे न मिळाल्याच्या तक्रारींना गांभीर्याने घेत संबंधित यंत्रणांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. चिखली बु. येथील अनिताबाई ज्ञानू पवार व संतोष मंगु पवार यांच्या तक्रारीनंतर हा विषय राज्यस्तरावर पोहोचला असून प्रशासन हलले आहे. नाफेड व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत लातूर विभागीय कार्यालयाला तातडीने चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तालुकास्तरीय दक्षता पथकाकडेही अहवाल देण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, किनवट केंद्रावरून मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करण्यात आली असली तरी सुमारे १२०० ते १५०० क्विंटल सोयाबीनचे चुकारे प्रलंबित असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात आल्या आहेत. ही संख्या वाढून ३००० क्विंटलपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त होत असून त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याचा संशय व्यक्त केला जात आहे. संबंधित बाजार समितीचे सभापती व सचिव यांच्याशी संपर्क होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. काही कर्मचाऱ्यांकडून "तांत्रिक अडचणी"चे कारण दिले जात असले तरी शेतकरी यावर समाधान व्यक्त करत नाहीत. खरीप हंगाम जवळ येत असताना पेरणीसाठी आवश्यक असलेली रक्कम अडकून पडल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी व शेतकऱ्यांचे प्रलंबित चुकारे तात्काळ अदा करावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

संपूर्ण प्रक्रिया होणार ऑनलाईन प्रणालीद्वारे

नांदेड : (समर्थ गांवकरी)

आपले सरकार सेवा केंद्र वाटपाची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन प्रणालीद्वारे केली जाणार असून, अर्जदारांनी ऑनलाईन दाखल केलेल्या कागपत्रांचे आधारे शासन निर्णयानुसार पुढीलप्रमाणे गुणांकन करण्यात येईल. कोणत्याही शाखेचा पदवीधर असल्यास ३० गुण, कोणत्याही शाखेचा पदव्युत्तर असल्यास २५ गुण, सीएससी केंद्र असल्यास २५ गुण याप्रमाणे गुणांकन राहील. एका गावासाठी एकापेक्षा जास्त अर्जदार असतील आणि त्यांचे गुण समान असतील तरच मुलाखत घेतली जाईल. मुलाखतीसाठी २० गुण निश्चित आहेत. मुलाखतीच्या गुणांची विभागणी खालील प्रमाणे करण्यात येईल.

दिव्यांग हयुमन राईट फेडरेशनचे ठाणे पालिका मुख्यालयावर आक्रोश आंदोलन

ठाणे : (समर्थ गांवकरी)

दिव्यांग हयुमन राईट फेडरेशनच्या वतिने दिव्यांग, विधवा महिला, ज्येष्ठ नागरिक, वंचित बहुजन मागासवर्गीय या समाजातील सर्व घटकांसाठी ठाणे महानगरपालिकेवर आक्रोश आंदोलन, बेमुदत उपोषण सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. प्रा.भरत जाधव संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष दिव्यांग हयुमन राईट फेडरेशन यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी समाजसेवक उपस्थित होते. दिव्यांग कायदा २०१६ नुसार वार्षिक उत्पन्नातुन ५ टक्के राखीव निधी खर्च करणे. दिव्यांगाच्या ४ ते ५ टक्के नोकर भरती तत्काळ करणे. दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणी करणे. दिव्यांगाना घरकुलं योजना कस्टर, पंतप्रधान योजना इत्यादी ५ टक्केघरे, गाळे राखीव ठेवावेत, ठाणे महानगरपालिका हॉस्पिटलमध्ये

मोफत सुविधा उपलब्ध करुन द्यावी. विधवा महिला, ज्येष्ठ नागरिकांना लवकर अनुदान मिळावे तसेच दिव्यांगाना ५ टक्के सदस्य विविध समित्या व स्विकृत नगरसेवक, नगरसेवक समाजसेवक, शिक्षण, क्रिडा इत्यादी क्षेत्रातील दिव्यांगाची नियुक्ती करावी. पाणी व टॅक्स मोफत करण्यात यावाअश्या मागण्या करण्यात आल्या.

विविध मागण्याचा पाठपुरावा करून ठाणे पालिकेचे अतिरिक्त आयुक्त मा. संदीप माळवी यांनी एप्रिल महिन्यातच्या पहिल्या आठवड्यात कार्यवाही करणारे पेपर व माहिती देऊ असे आदेश सर्व विभागाला दिले.

या आंदोलनाला प्रा.विलास शेजुळ यांनी आरक्षण बचाव समितीचा पाठिंबा जाहीर देऊन संविधान कायद्याचे तुमच्या सोबत लढा असे सांगितले. या आंदोलनात बहुसंख्य दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला, वंचित बहुजन मागासवर्गीय समाजातील समाजसेवक पदाधिकारी सहभागी झाले. संतोष मोरे उपाध्यक्ष, चंद्रकांत पाटील संघटक, विकास पवार संघटक ठाणे, रमेश पाटील दिवा शहर अध्यक्ष, रोहीदास जाधव संघटक ठाणे शहर, संतोषी सिंग महाराष्ट्र महिला संघटक प्रमुख, मनिषा भोईर, महिला संघटक , रेणूका गायकवाड महिला कोळसेत प्रमुख नेताजी चौधरी सल्लागार, हैदर भाई, अन्वर खलिते कोकण विभाग अध्यक्ष सिंग भाई मुंलुड संघटक बहुसंख्य सदस्य समाजसेवक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गॅस सिलेंडर पुरवठ्याचा महापौर व आयुक्तांनी घेतला आढावा

ठाणे : (समर्थ गांवकरी)

आखाती देशात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिका हद्दीत घरगुती तसेच व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या पुरवठ्याची सद्यस्थिती, उपलब्ध साठा तसेच वितरण व्यवस्था याबाबतचा सविस्तर आढावा घेण्यासाठी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (23 मार्च) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस महापालिका आयुक्त सौरभ राव उपस्थित होते. नागरिकांना वेळेत गॅस मिळावा, शहरात कुठेही गॅसचा काळाबाजार होत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ कारवाई करण्याचे तसेच ज्या सोसायट्यांमध्ये प्रलंबित महानगर गॅसची कनेक्शन त्वरित सुरू करण्याबाबतची कामे जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांनी बैठकीत

दिले. या बैठकीस उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ. शानू पठाण, सर्वपक्षीय गटनेते पवन कदम, मुकेश मोकाशी, अभिजीत पवार, सरफराज खान, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव म्हस्के पाटील, पोलीस विशेष शाखेच्या मीना मकवाना, उपआयुक्त मधुकर बोडके, शिधावाटप कार्यालयाचे प्रशांत काळे, सुरेखा चव्हाण सुभाष डुंबरे, रोहित माळकर, हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशनचे नोडल अधिकारी चित्रा नायर, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनचे मयांक तलरेजा, इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे सारंश शाहू, तसेच महानगरगॅसचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत ऑनलाइन बुकिंग करणाऱ्या ग्राहकांना सिलेंडर वेळेत मिळत आहे. तसेच वेटिंग लिस्ट कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या असल्याचे एचपी गॅसचे जिल्हा नोडल अधिकारी चित्रा नायर यांनी नमूद केले. विशेषतः लहान व्यावसायिकांना वेळेत सिलेंडर मिळत नसल्याबाबत चर्चा करण्यात आली. याबाबत शासनस्तरावर चर्चा सुरू असून शासनाकडून सूचना मिळाल्यानंतर छोट्या व्यावसायिकांना देण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडरबाबत निर्णय घेण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. प्रत्येक प्रभागातील नागरिकांच्या गॅस कनेक्शनसंदर्भातील मागण्या संकलित करून त्या संबंधित कंपन्यांकडे पाठवाव्यात. त्यानुसार महानगर गॅस व इतर गॅस कंपन्यांनी प्राधान्यक्रम ठरवून कामे पूर्ण करावीत असे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी दिले.

बीएड कॉलेजला चार लॅपटॉप भेट

शेवगाव : (समर्थ गांवकरी)

आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बी. एड.) शेवगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे पोलीस उपनिरीक्षक सतीश हनुमंतराव शिदोरे (खारघर वाहतूक शाखा, नवी मुंबई) यांनी त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपयोगासाठी चार लॅपटॉप, चार चार्जर व दोन कीबोर्ड अशी भेट दिली. ही साहित्य भेट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान बारस्कर, प्राचार्य भालसिंग मॅडम, नाईक मॅडम, नेव्हल सर, बांगर सर, काळे सर तसेच क्लर्क गोरे सर व काकडे मॅडम यांच्या उपस्थितीत सुपूर्द करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक सतीश शिदोरे यांचा सत्कार करण्यात आला. भविष्यातही शिक्षण क्षेत्रासाठी अशीच मदत करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

पळसपूर शिवारात अवैध हातभट्टीवर पोलिसांचा मोठा छापा

दीड लाखांचे रसायन जप्त, आरोपी अटकेत

पारनेर : (समर्थ गांवकरी)

मानवी जीवितास धोकादायक ठरू शकणाऱ्या अवैध हातभट्टीच्या दारू निर्मितीविरोधात पारनेर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पळसपूर (ता. पारनेर) गावच्या शिवारात ओढ्यालगत असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या हातभट्टीवर छापा टाकून पोलिसांनी सुमारे १ लाख ६४ हजार ५०० रुपये किमतीचे कच्चे रसायन आणि तयार दारू जप्त केली आहे. याप्रकरणी मुख्य आरोपी वसंत बाबाजी आहेर याला अटक करण्यात आली असून अन्य आरोपींचा शोध सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २३ मार्च २०२६ रोजी पोलीस निरीक्षक संतोष खेडकर आणि त्यांचे पथक टाकळी ढोकेश्वर दूरक्षेत्र हद्दीत गस्तीवर असताना त्यांना गुप्त बातमीदाराकडून महत्त्वाची माहिती मिळाली. पळसपूर येथील केशव

आनंत गुंजाळ यांच्या घराजवळील एका पत्र्याच्या शेडमध्ये काही इसम बेकायदेशीरपणे कच्चे रसायन वापरून गावठी दारू गाळत असल्याची खात्रीशीर बातमी पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने पथक तयार करून संबंधित ठिकाणी छापा टाकला.

या कारवाई दरम्यान पोलिसांना २,२०० लिटर कच्चे रसायन (किंमत १ लाख ५४ हजार रुपये) आणि १०५ लिटर तयार गावठी हातभट्टीची दारू (किंमत १० हजार ५०० रुपये) असा एकूण १,६४,५०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून वसंत बाबाजी आहेर (वय ३३) याला ताब्यात घेतले, तर गोकुळ बाबाजी आहेर, गोरक्ष पांडुरंग पोपळघट आणि 'भाईक' नावाचा एक इसम अशा चौघांविरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३, २४७, २७५, ३(५) आणि महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष खेडकर, सपोनि नितीन खंडागळे आणि त्यांच्या पथकाने केली आहे. सध्या आरोपी पोलीस कोठडीत असून सहायक पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

माजी आमदार ॲड. भोसीकरांनी बजावला मतदानाचा हक्क

कंधार : (समर्थ गांवकरी)

बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा निवडणुकीची मतदान प्रक्रिया मंगळवारी कंधारमध्ये उत्साहात पार पडली. कंधार विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार ॲड. ईश्वरराव भोसीकर यांनी मतदान केंद्रावर उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क बजावला. भोसीकरांनी ९२ व्या वर्षी निवडणुकीत सहभागी होऊन सहकारी वकिलांनाही मतदानासाठी प्रोत्साहित केले. लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. निवडणुकीत विधिज्ञांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवित आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदान केंद्रावर शांततेत व सुरळीत वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडली. स्थानिक वकिलांमध्ये या निवडणुकीबाबत उत्सुकता पाहायला मिळाली. बार कौन्सिलच्या माध्यमातून वकिलांच्या प्रश्नांना न्याय मिळावा, तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, यासाठी ही निवडणूक महत्त्वाची मानली जाते. एकूणच, कंधारमध्ये बार कौन्सिल निवडणुकीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

आरोग्य, वीज, शेतकरी व पर्यटन प्रश्नांवर आ. काशिनाथ दाते यांचा आवाज

पारनेर : (समर्थ गांवकरी)

मंगळवार दि. २४ मार्च २०२६ महाराष्ट्र विधानमंडळाच्या प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशनात म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावावर चर्चा करताना पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी विविध लोकहिताच्या प्रश्नांवर प्रभावीपणे मांडणी करत शासनाचे लक्ष वेधले. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेबाबत बोलताना आमदार दाते यांनी सांगितले की, राज्यात जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असल्या तरी डॉक्टर व नर्सेसच्या मोठ्या प्रमाणातील रिक्त जागांमुळे नागरिकांना अपेक्षित सेवा मिळण्यात अडथळे निर्माण

होत आहेत. राज्यात अजूनही सुमारे ३९८ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २८०६ उपकेंद्रांची आवश्यकता असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच २००६ पासून लागू असलेल्या एमबीबीएस बंधपत्र धोरणात बदल करून इच्छुक डॉक्टरांना कायमस्वरूपी सेवा देण्याची संधी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

ऊर्जा विषयावर बोलताना आमदार दाते यांनी राज्याच्या स्वयंपूर्ण ऊर्जाधोरणाचे स्वागत केले; मात्र सौरऊर्जा प्रकल्प अपूर्ण असल्याने ग्रामीण भागात संध्याकाळी ६ ते रात्री १० या वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याची गंभीर समस्या मांडली. यामुळे शेतकरी, विद्यार्थी व गृहिणींना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगत महावितरणला तातडीने योग्य सूचना देण्याची मागणी केली. अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे मतदारसंघातील नांदगाव, शिंगवे, ढवळपुरी, ढोकी, धोत्रे, निघोज, भाळवणी, वडगाव आमली आदी गावांमध्ये कांदा, कलिंगड, डाळिंब, टोमॅटो, आंबा व गहू पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. या सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून मदत देण्याची त्यांनी शासनाकडे केली.

औद्योगिक विकासाच्या संदर्भात बोलताना आमदार दाते यांनी राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येत असल्याचे नमूद केले.

मात्र MIDC साठी शेतकऱ्यांकडून महागड्या दराने जमीन खरेदी करण्याऐवजी उपलब्ध सरकारी माळरान जमिनीचा उपयोग करण्याचा विचार शासनाने करावा, असे सुचवले. तसेच अजितदादा पवार यांच्या विमान अपघात प्रकरणातील चौकशीबाबत पारदर्शकता राखत जनतेसमोर माहिती यावी, अशीही त्यांनी मागणी केली.

पर्यटन विकासाच्या दृष्टीने निघोज येथील रांजण खळगे, दर्याबाई, वेल्हाबाई परिसर तसेच सिद्धेश्वर मंदिर यांसारख्या निसर्गरम्य स्थळांचा विकास केल्यास स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असे सांगत मतदारसंघातील पर्यटनाला चालना देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

लोकहिताच्या विविध प्रश्नांवर अभ्यासपूर्ण व ठाम मांडणी करत आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत मतदारसंघाचा आवाज बुलंद केल्याने त्यांच्या कार्यशैलीचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.

४ हजार एकर जमिनीसंदर्भात

खा. लंके यांचे उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

संशयास्पद कंपन्यांना जमीन देण्याच्या प्रस्तावावर कारवाईची मागणी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

श्रीरामपूर तालुक्यातील महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व शेती महामंडळाकडे असलेली सुमारे ४ हजार एकर बागायती जमीन झेड आर टू ग्रुप होल्डिंग कंपनी व झेड आर टू बायो एनर्जी कंपनी लिमिटेड या खाजगी कंपन्यांना देण्याच्या प्रस्तावावर खासदार नीलेश लंके यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनात खा. लंके यांनी नमूद केले आहे की, संबंधित कंपन्यांची रचना, आर्थिक व्यवहार व संचालक मंडळातील परस्पर संबंध अत्यंत संशयास्पद असून या कंपन्यांची 'शेल' स्वरूपाची शक्यता नाकारता येत नाही. झेड आर टू ग्रुप होल्डिंग कंपनी व झेड आर टू बायो एनर्जी कंपनी लिमिटेड यांच्यात ६१ टक्के भागभांडवलाद्वारे थेट नियंत्रण संबंध असून दोन्ही कंपन्यांमध्ये समान संचालक कार्यरत आहेत. तसेच या कंपन्यांचे इतर संबंधित संस्थांशीही हितसंबंध असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. कंपनीच्या आर्थिक व्यवहारांमध्येही विसंगती आढळून येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अत्यल्प किंवा शून्य उलाढाल असताना कोट्यवधी रुपयांचा नफा दाखविणे, तसेच अचानक मोठ्या प्रमाणात भांडवली वाढ दर्शविणे व त्याबाबत स्पष्ट माहिती न देणे या बाबी गंभीर स्वरूपाच्या असल्याचे खा. लंके यांनी म्हटले आहे. याशिवाय, विमान इंधन निर्मितीसारख्या प्रकल्पासाठी आवश्यक असलेली तांत्रिक व व्यावसायिक पात्रता संबंधित कंपन्यांकडे नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांशी कोणतेही करार नसताना एवढ्या मोठ्या प्रकल्पासाठी जमीन मागणी करण्यात येत असल्यामुळे प्रकल्पाच्या व्यवहार्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. श्रीरामपूर तालुक्यातील ही जमीन हजारो कोटी रुपयांची मौल्यवान सार्वजनिक संपत्ती

असून तिचे हस्तांतरण करताना पारदर्शकता व सखोल तपासणी आवश्यक असल्याचे खा. लंके यांनी अधोरेखित केले आहे. "जनतेच्या मालकीची जमीन कोणत्याही परिस्थितीत संशयास्पद कंपन्यांना देण्यात येऊ नये," अशी ठाम भूमिका त्यांनी व्यक्त केली. खा. लंके यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केलेल्या मागण्यांमधे संबंधित कंपन्यांची आर्थिक, तांत्रिक व कायदेशीर पात्रता स्वतंत्र उच्चस्तरीय समितीमार्फत तपासावी, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव तात्काळ स्थगित किंवा रद्द करण्यात यावा यांचा समावेश आहे.

भारतीय चिकित्सा पद्धतींना जागतिक मान्यता

उपराष्ट्रपती राधाकृष्णन

उरुळी कांचन (समर्थ गांवकरी)

भारतीय पारंपरिक चिकित्सा पद्धतींना जागतिक स्तरावर मान्यता मिळत असल्याचे प्रतिपादन भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. उरुळी कांचन येथील निसर्गोपचार ग्राम सुधार ट्रस्टच्या ८१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आरोग्य रक्षणासाठी आयुष मंत्रालयातर्फे योग, आयुर्वेद आणि निसर्गोपचार यांसारख्या पद्धती प्रभावी ठरत असून, शारीरिक व मानसिक स्वास्थ्य जपण्याची मोठी क्षमता या पद्धतींमध्ये आहे, असे त्यांनी नमूद केले. ऍलोपॅथी उपचार पद्धती आवश्यक असली तरी भारतीय चिकित्सा पद्धतींचे महत्त्वही तितकेच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महात्मा गांधी यांनी ८१ वर्षांपूर्वी उरुळी कांचन येथे निसर्गोपचार पद्धतीची सुरुवात केली होती. आजही हा आश्रम आरोग्य संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण कार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आयुष मंत्रालयात झालेल्या बदलांमुळे योग, आयुर्वेद आणि निसर्गोपचाराला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली असल्याचेही त्यांनी नमूद केले. जीवनात साधेपणा आणि शिस्त महत्त्वाची असून, गरजा मर्यादित ठेवण्याचा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी निसर्गोपचार आश्रमाचे प्रमुख विश्वस्त डॉ. एन. जी. हेगडे यांनी प्रास्ताविकात आश्रमाच्या कार्याचा आढावा घेतला. महात्मा गांधी यांनी डॉ. मणीभाई देसाई यांच्याकडे जबाबदारी सोपविल्यानंतर त्यांनी 'बायफ' सारख्या संस्थांद्वारे ग्रामीण आरोग्य, ग्रामविकास, दुग्धोत्पादन आणि पर्यावरण क्षेत्रात मोठे योगदान दिल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात 'सीक्रेट्स ऑफ हॅपिनेस' या पुस्तकाचे प्रकाशन उपराष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राज्यपाल विष्णू देव वर्मा, राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश सिंह, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार ज्ञानेश्वर कटके, डॉ. भावार्थ देखणे, डॉ. अभिषेक देवीकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जय महाजन यांनी केले.

डॉ. किशोर पाटील यांना पुरस्कार 'प्रदान!

- निर्भीड लेखणीला मानाचा तुरा
- तीन दशकांची समाजाभिमुख पत्रकारिता गौरवली

रोहा - रायगड: (समर्थ गांवकरी)

सत्य, न्याय आणि लोकहितासाठी निर्भीडपणे आवाज उठवणारे ज्येष्ठ पत्रकार तसेच ठाणे जिल्ह्यातील अग्रगण्य मराठी दैनिक स्वराज्य तोरण चे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांना प्रतिष्ठेचा समजला जाणारा बाळशास्त्री जांभेकर प्रेरणा पत्रकार भूषण पुरस्कार – २०२६ 'प्रदान करून सन्मानाने रायगड जिल्ह्यातील रोहा येथे गौरविण्यात आले. साप्ताहिक "आजचा महाराष्ट्र" आणि टॉप टेन न्यूज – न्यूज पोर्टल व यूट्यूब चॅनेल यांच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त रविवार दिनांक २२ मार्च २०२६ रोजी रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक सभागृह रोहा नगर परिषद रोहा येथील आयोजित विशेष कार्यक्रमात हा सन्मान करण्यात आला. गेल्या ३० वर्षांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रात निस्वार्थ, निष्ठावान आणि समाजाभिमुख कार्य करत अनेक महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या डॉ.श्री.किशोर पाटील यांच्या कार्याचा या वेळी विशेष गौरव करण्यात आला. आगरी समाजातून महाराष्ट्रातील एकमेव मराठी दैनिकाचे संपादक म्हणून मागील १८ वर्षे त्यांनी प्रभावी नेतृत्व करत पत्रकारितेत वेगळी ओळख निर्माण केली आहे. पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या आदर्श विचारांप्रती कृतज्ञता व्यक्त करत सत्यनिष्ठ, निर्भीड आणि लोकाभिमुख पत्रकारितेचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे साप्ताहिक "आजचा महाराष्ट्र" आणि टॉप टेन न्यूज – न्यूज पोर्टल व यूट्यूब चॅनेल यांनी आयोजीत कार्यक्रमात सांगितले.

क्रॉम्प्टनचा 'अमिओ फ्रेश' कोल्ड प्रेस ज्यूसर लाँच

मुंबई: (समर्थ गांवकरी)

धावपळीच्या जीवनशैलीत संतुलित पोषण राखणे कठीण होत असताना क्रॉम्प्टन ग्रीव्ज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने 'हेल्दी चॉईसेस मेड ईजीयर'

या उपक्रमांतर्गत 'अमिओ फ्रेश' कोल्ड प्रेस ज्यूसर बाजारात आणला आहे. हा ज्यूसर कोल्ड प्रेस तंत्रज्ञानावर आधारित असून फळे, भाज्या आणि नट्समधील आवश्यक पोषक घटक, जीवनसत्त्वे आणि अँटी-ऑक्सिडंट्स टिकवून ठेवण्यास मदत करतो. पारंपरिक ज्यूसिंग पद्धतींमध्ये उष्णता आणि उच्च गतीमुळे पोषणाचा ऱ्हास होत असताना, अमिओ फ्रेश सुमारे 90 टक्क्यांपर्यंत पोषक तत्वे जतन करतो, असे कंपनीने सांगितले.

महाराष्ट्र-मॉरिशस स्नेहबंध अधिक दृढ; 'महाराष्ट्र भवन' विस्ताराचा शिलान्यास

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र आणि मॉरिशस यांच्यातील मैत्रीचे नाते पिढ्यानपिढ्यांचे असून, सातासमुद्रापार राहूनही येथील मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अभिमानाने जपली आहे, असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. मॉरिशसच्या मोका येथे महाराष्ट्र भवनाच्या विस्तारित वास्तूचा पायाभरणी सोहळा त्यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने या प्रकल्पासाठी ८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली. दोन दिवसीय दौऱ्यात चव्हाण यांनी मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष धरमबीर गोखुल यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी भारत-मॉरिशस संबंध, ब्ल्यू इकॉनॉमी, पर्यटन, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि सायबर सुरक्षा यांसारख्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. "मॉरिशस हा भारताचा लहान भाऊ आहे," असे सांगत राष्ट्राध्यक्षांनी भारताच्या नेतृत्वाचे कौतुक केले. तसेच मॉरिशसचे परराष्ट्र मंत्री धनंजय रामफुल, आयटी व इनोव्हेशन मंत्री डॉ. अविनाश रामतोहूल आणि कला व सांस्कृतिक मंत्री महेंद्र गोंदीया यांच्यासोबतही महत्त्वपूर्ण बैठका झाल्या. एआय क्षेत्रात मॉरिशसला आफ्रिकेसाठी प्रवेशद्वार बनविण्यासाठी भारताच्या सहकार्याची गरज असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. मोका येथे उभारल्या जाणाऱ्या महाराष्ट्र भवनाच्या विस्तारित वास्तूमुळे जागतिक स्तरावर मराठी अस्मितेला बळ मिळणार आहे. या वास्तूतील सभागृहाला 'स्वातंत्र्यवीर सावरकर' यांचे नाव देण्यास स्थानिक मराठी समाजाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या दौऱ्यात सांस्कृतिक देवाण-घेवाण, 'महा गणेशोत्सव २०२५' निमित्त अनुदान वितरण, तसेच विविध मराठी संस्थांना आर्थिक मदत देण्यात आली. मॉरिशसमधील मराठी मंडळी फेडरेशन, मराठी स्पिकिंग युनियन आणि विविध मंदिर व सामाजिक संस्थांना अनुदानाचे धनादेश सुपूर्द करण्यात आले. या सर्व घडामोडींमुळे महाराष्ट्र आणि मॉरिशस यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ होत असून, मराठी संस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रसार होत असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

जामखेड नगरपरिषदेने शंभर टक्के शास्ती माफ करावी - प्रा. कैलास माने

जामखेड : (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील कोपरगाव व श्रीगोंदा नगरपरिषदेला नगरविकास मंत्रालयाने शंभर टक्के व्याज व दंड माफी दिली आहे. जामखेड हा दुष्काळी भाग असल्याने याठिकाणी कोणताही पाहीजे तसा उत्पन्नाचा स्त्रोत नाही. त्यामुळे जामखेडकरांना देखील नगरपरिषदेच्या माध्यमातून शंभर टक्के शास्ती कर माफ करावी अशी मागणी शिवसेना तालुकाप्रमुख प्रा. कैलास माने सर यांनी केली आहे. पुढे बोलताना प्रा. कैलास माने सर म्हणाले की जामखेड शहराचा शास्ती माफीचा विषय हा महत्त्वाचा विषय आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव व श्रीगोंदा नगरपरिषदेमध्ये शासनाकडून शंभर टक्के शास्ती माफी शासनाने दिली आहे. मात्र जामखेड जाहिरात करुन पन्नास टक्के शास्ती माफी आहे असे सांगितले परंतु जामखेड नगरपरिषदेला मी सांगु इच्छितो की आपण महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव देऊन जामखेड शहरातील सर्व सामान्य नागरिकांना शंभर टक्के शास्ती माफीची विनंती शासनास करावी. जामखेड तालुक्याला आ. रोहीत पवार व प्रा. राम शिंदे हे दोन आमदार लाभले आहेत. प्रा. राम शिंदे हे विधान परिषदेचे सभापती आहेत. विशेष म्हणजे नगरपरिषदेमध्ये भाजपची एकहाती सत्ता आहे. शास्ती माफीचा प्रस्ताव नगरपरिषदेने महाराष्ट्र शासनाला दिल्यास सभापती प्रा. राम शिंदे यांच्या माध्यमातुन जामखेड करांना शास्ती माफ मध्ये न्याय मिळु शकतो. जामखेड तालुका हा दुष्काळी भाग आहे. जर शास्ती माफी केली तर नगरपरिषदेच्या तीजोरीत कोट्यवधी रुपये जमा होऊ शकतात. जमा झालेला पैसा जामखेडच्या विकासासाठी वापरुन जामखेड चा विकास होण्यास मदत होईल. त्यामुळे लवकरात लवकर नगरपरिषदेच्या माध्यमातून शास्ती माफीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवुन व शास्ती माफी करुन जामखेड करांना न्याय द्यावा अशी मागणी शिवसेना तालुकाप्रमुख प्रा. कैलास माने सर यांनी केली आहे.

"सुविधा नाहीत, तर शास्ती कर कशासाठी?"

नगर परिषदेकडून नागरिकांना पाणी, रस्ते, स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधा व्यवस्थित मिळत नसताना शास्ती कर आकारला जाणे ही अत्यंत अन्यायकारक बाब आहे. कर म्हणजे नागरिकांनी भरलेली जबाबदारी आहे, पण त्याबदल्यात सुविधा देणे ही नगर परिषदेची तितकीच जबाबदारी आहे. नगर परिषद प्रशासनाने शहरातील पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, स्वच्छता व्यवस्था सुधारावी व त्या नंतरच नागरिकांकडून शास्ती कर वसूल करावा. अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

- (अवधुत पवार (सामाजिक कार्यकर्ते)

४ एप्रिल रोजी शिर्डीत दैनिक समर्थ गांवकरी समूहाचा संपादक-वार्ताहर मेळावा

शिर्डी : (समर्थ गांवकरी)

दैनिक समर्थ गावकरी समूहाच्या वतीने संपादक, जिल्हा प्रतिनिधी आणि वार्ताहर यांचा भव्य मेळावा तसेच विशेष सन्मान सोहळा येत्या ४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा शिर्डी येथील आत्मा मलिक संस्थान, ध्यानपीठ (समृद्धी महामार्गाजवळ, कोकमठाण, ता. कोपरगाव) येथे पार पडणार आहे. या मेळाव्यात समूहाशी संलग्न असलेल्या संपादक, उपसंपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहर यांचा सन्मान करण्यात येणार असून, त्यांना ओळखपत्र व विविध साहित्याचे वितरण केले जाणार आहे. पत्रकारितेतील कार्याचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. या प्रसंगी दैनिक समर्थ गावकरी समूहाचे समूह संपादक डॉ. नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे पत्रकारांना नव्या दिशादर्शनाची संधी मिळणार आहे. समूहाशी निगडित सर्व पदाधिकाऱ्यांनी व प्रतिनिधींनी या मेळाव्यास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, कार्यक्रमास सहपत्नी व सहपरिवार उपस्थित राहण्याचेही निमंत्रण देण्यात आले आहे. हा मेळावा केवळ सन्मान सोहळा नसून, पत्रकारांमध्ये संवाद वाढवणे, नेटवर्क मजबूत करणे आणि समूहाच्या कार्याला नवी दिशा देणे हा उद्देश असल्याचे संपादक विश्वासराव आरोटे यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्राचा पहिला मराठी पॉप कल्चर फेस्टिव्हल सज्ज

पुणे : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील मराठी पॉप कल्चरला समर्पित असा पहिलाच फेस्टिव्हल 'राडा २०२६' पुण्यात रंगणार असून, मराठी तरुणांसाठी हा एक मोठा सांस्कृतिक उत्सव ठरणार आहे. भाडीपा (भारतीय डिजिटल पार्टी) प्रस्तुत हा दोन दिवसीय फेस्टिव्हल २८ आणि २९ मार्च २०२६ रोजी बालेवाडी येथील द ऑर्किड हॉटेलमध्ये प्रथमच आयोजित करण्यात येणार आहे.

मराठी कलाकार, कॉमेडियन, डिजिटल क्रिएटर्स आणि पॅनेलिस्ट यांना एकत्र आणणारा हा उत्सव 'मराठी इंटरनेट'चा प्रत्यक्ष अनुभव देणार आहे. जागतिक स्तरावर मराठी टॅलेंटची वाढती छाप लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या फेस्टिव्हलमध्ये मराठी रॉकस्टार अवधूत गुप्ते, लोकप्रिय यूट्यबर प्राजक्ता कोळी, डीजे क्रेटेक्स, रॅपर यंग डीएसए, 'हसल २.०' फेम सृष्टी तावडे, यशराज मुखाटे आणि नील साळेकर यांसारखे नामांकित कलाकार सहभागी होणार आहेत. तसेच 'कास्टिंग काउच' मालिकेतील अभिनेते अमेय वाघ आणि निपुण धर्माधिकारी यांचीही उपस्थिती असणार आहे. भाडीपाचे सह-संस्थापक सारंग साठ्ये आणि पॉला मॅकग्लिन यांनी सांगितले की, "मराठी टॅलेंट आज जगभर झळकत असले तरी त्याचा उत्सव साजरा करण्यासाठी व्यासपीठ नव्हते. 'राडा' हा त्याच दिशेने एक महत्त्वाचा प्रयत्न आहे." या फेस्टिव्हलमध्ये लाईव्ह परफॉर्मन्सेस, चर्चासत्रे आणि कलाकार-चाहत्यांमधील थेट संवाद यामुळे मराठी पॉप कल्चरला नवी दिशा मिळणार आहे. जागतिक पातळीवर मराठी संस्कृती पोहोचविण्यासाठी 'राडा २०२६' हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

श्रीरामनवमी उत्सवासाठी शिर्डी सज्ज; अशी केली जय्यत तयारी!

अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)

श्री साईबाबा संस्थान (शिर्डी)च्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षी २५ ते २७ मार्च २०२६ या कालावधीत ११५ वा श्रीरामनवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून, त्यासाठी जय्यत तयारी पूर्ण करण्यात आली आहे. उत्सवानिमित्त संस्थानकडून १ लाख ६६ हजार ५५० भक्तमंडळ सभासदांना निमंत्रण पत्रिका पाठविण्यात आल्या आहेत. तसेच सुमारे २ लाखांहून अधिक साईभक्तांना एसएमएस व ई-मेलद्वारे आमंत्रित करण्यात आले आहे. उत्सवासाठी शिर्डीत आकर्षक सजावट करण्यात येत असून मुंबईच्या द्वारकामाई मंडळाकडून विद्युत रोषणाईची व्यवस्था केली आहे. प्रवेशद्वार क्रमांक ४ येथे 'श्री साई मयूरद्वार'चा भव्य देखावा उभारण्यात येत आहे. तसेच बेंगळुरू येथील दानशूर साईभक्त व्यंकटा सुब्रमण्यम यांच्या देणगीतून फुलांची आकर्षक सजावट केली जाणार आहे. उत्सवकाळात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. ते पुढे म्हणाले की, १९११ मध्ये साईबाबांच्या अनुमतीने सुरू झालेला हा उत्सव आजही दरवर्षी मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. यंदाही लाखो भाविकांच्या उपस्थितीत शिर्डीत भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळणार आहे.

जाहीर नोटीस

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/४०/२०२६ अकोले दि.२३/०३/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. शुभम बाळु लोटे, रा. चिंचोडी**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांची मुलगी कु. कनिष्का शुभम लोटे हिचा जन्म दि. ०७/०३/२०२५ रोजी चिचोंडी** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **चिचोंडी**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. शुभम बाळु लोटे, रा. चिंचोडी**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांची मुलगी कु. कनिष्का शुभम लोटे हिचा जन्म दि. ०७/०३/२०२५ रोजी चिचोंडी** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **चिचोंडी**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २३/०३/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

कामगिरी क्लर्क

पळसगाव ग्राम पंचायत गैरकारभारचा पहिला फटका

- क्रीडांगण निधी परत करण्याची नामुष्की
- पळसगाव शाळेचे प्रकरण तापले!
- क्रीडाधिकारी यांनी व्याजा सह. वसुलीचे पत्र काढले

नायगाव : (समर्थ गांवकरी)

नायगाव तालुक्यातील क्रीडांगण विकासासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या वापरात गंभीर अनियमितता उघड झाल्याने पळसगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला तब्बल ₹10.78 लाखांची रक्कम सव्याज परत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या घटनेमुळे शिक्षण व क्रीडा विभागात खळबळ उडाली असून संबंधितांवर कारवाईची मागणी जोर धरत आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या आदेशानुसार, सन 2022-23 मधील क्रीडांगण विकास योजनेअंतर्गत शाळेस ₹7 लाखांचे अनुदान देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष पाहणी अहवाल व चौकशी समितीच्या निष्कर्षांनुसार या निधीचा योग्य वापर न झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

शासन निर्णयानुसार 18% दराने व्याज लावून एकूण रक्कम ₹10,78,000 इतकी झाली असून ती 15 एप्रिल 2026 पर्यंत परत करण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत. अन्यथा पुढील कठोर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे. पळसगाव येथील नागरिकांनी श्री. बळवंत शिंदे व इतर यांनी स्वाक्षऱ्या करून केलेल्या तक्रारीनंतर हे प्रकरण समोर आले. त्यानंतर चौकशी समितीने प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर केला आणि अखेर हा मोठा गैरव्यवहार उघड झाला. जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, "अनुदानाचा विनियोग नियमांनुसार झाला नसल्यास परतफेड अपरिहार्य आहे." त्यामुळे संबंधित जबाबदारांवर कारवाईची शक्यता अधिक बळावली आहे.

मोठे प्रश्न उपस्थित

क्रीडांगणाचा निधी गेला कुठे?
काम न करता कागदोपत्री पूर्तता दाखवली का?
जबाबदार अधिकारी व संबंधितांवर कारवाई कधी?
पळसगाव प्रकरणामुळे जिल्ह्यातील इतर कामांचीही चौकशी होणार का?
या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यातील क्रीडांगण विकास कामांवर संशयाचे सावट पसरले असून पुढील काही दिवसांत आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ठाणे : भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा आणि राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा या सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आज ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर तहसीलदार कार्यालय येथे ओबीसींची जातनिहाय जनगणना आणि यूजीसी इक्विटी रेग्युलेशन लागू करण्यासह विविध मागण्यांसाठी भव्य मोर्चा काढण्यात आला. भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. वामन मेश्राम आणि राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. चौधरी विकास पटेल यांच्या नेतृत्वाखाली पुकारण्यात आलेल्या राष्ट्रव्यापी आंदोलनाचा हा तिसरा टप्पा होता. भारतातील ३२ राज्यांमधील ७२५ जिल्ह्यांत एकाच वेळी जिल्हाधिकारी कार्यालयांवर धडक देण्याच्या या मोहिमेचा भाग म्हणून ठाणे जिल्ह्यात मा शैलेश सालवे अध्यक्ष भारत मुक्ति मोर्चा ठाणे , यांच्या नेतृत्वाखाली उल्हासनगर तहसील कार्यालयावर हा विराट मोर्चा काढण्यात आला. (फोटो - संतोष पडवळ)

थोडक्यात बातम्या...

कल्याण तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये बायोमेट्रिक हजेरी सक्तीची

- गैरहजर राहणाऱ्यांवर कारवाईचा बडगा

ठाणे (स. गांवकरी) : सामाजिक कार्यकर्ते विशाल कुरकुटे यांच्या तक्रारीनंतर प्रशासनाने कल्याण तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियमित उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली तात्काळ सुरू करण्याचे आदेश पंचायत समिती प्रशासनाने दिले आहेत. सामाजिक कार्यकर्ते विशाल शांताराम कुरकुटे यांनी केलेल्या तक्रारीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. अनेक ग्रामपंचायतींमध्ये अधिकारी व कर्मचारी वेळेवर हजर राहत नसल्याच्या तसेच नागरिकांच्या कामांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी सतत प्राप्त होत होत्या. काही ठिकाणी कर्मचारी उशिरा येणे किंवा कार्यालयीन वेळेत अनुपस्थित राहणे यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले होते. प्रशासनाने सर्व ग्रामपंचायतींना बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करण्याचे आदेश दिले असून तिची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, याबाबत ढिलाई आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, या निर्णयामुळे ग्रामपंचायत स्तरावर शिस्त व पारदर्शकता वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हिंदू मुस्लिम समाजाचे ऐक्य असलेल्या चांनखन बाबा यात्रा उत्साहास सुरुवात

संगमनेर खुर्द (स. गांवकरी) : संगमनेर तालुक्यातील निमगाव पागा येथील चांनखन बाबा यात्रा उत्सवास मोठ्या उत्सवात सुरुवात झाली आहे. हिंदू व मुस्लिम धर्मचे ऐक्य असलेल्या चांनखन बाबाचा उत्सव काल पासून सुरवात झाली आहे. काल संध्याकाळी देवाचा छबिना, काठी मिरवणूक ढोल, ताशां, डीजे च्या गजरात गाव प्रदक्षिणा काढण्यात आली. यावेळी हिंदू बांधव व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने एकत्र येत संदल मिरवणूक काढण्यात आली. आज सकाळी देवाची महापूजा करून गुळ खोबरे, मलिदा इ. अर्पण करून यात्रा उत्सवास सुरुवात झाली असून, यावेळी मंदिर परिसर विद्युत रोषणाईने सजवण्यात आला आहे. चांनखन बाबाच्या यात्रेच्या निमित्ताने संपूर्ण निमगाव पागा,पेमगिरी, निमगाव खुर्द, सावरचोळ, मेगाळवाडी,कवठे धांदरफळ, सांगवी, धांदरफळ बु, निमज, संगमनेर,अकोले, पुणे नाशिक येथील भाविक भक्त मोठ्या भक्तीभावाने दर्शनासाठी येत असतात. यात्रा उत्सवाच्या निमित्ताने भाविक भक्तांसाठी मनोरंजन कार्यक्रम संध्याकाळी नऊ ते अकरा वाजेपर्यंत लोकनाट्य तमाशा व दुसऱ्या दिवशी जंगी कुस्त्यांचा हगामा होणार असल्याचे निमगाव बुद्रुक यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

श्रीगोंदा (स. गांवकरी) : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या त्यागातूनच रयत शिक्षण संस्था उभी राहिली. त्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यातील प्रेरणादायी सावली होत्या. बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले, असे प्रतिपादन महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी केले. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. राजाराम कानडे यांनी प्रस्तावना मांडली. यावेळी प्रा. संदीप दरेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, स्त्रियांच्या त्यागातूनच महापुरुष घडतात आणि लक्ष्मीबाईंच्या त्यागातून रयत शिक्षण संस्थेची भक्कम पायाभरणी झाली. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रो. डॉ. नितीन थोरात, अधीक्षक बाळासाहेब राऊत, डॉ. राहुल गायकवाड, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी शहीदांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन जागृत नागरिक बनावे – डॉ. एस. एस .तोळमारे

मुदखेड : (समर्थ गांवकरी)

"शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचे बलिदान हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील अमूल्य प्रेरणास्थान आहे. त्यांनी अल्पवयात देशासाठी प्राण अर्पण केले, ही बाब प्रत्येक तरुणासाठी आदर्श आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन देशभक्ती, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी अंगीकारावी. जागृत नागरिक बनणे हीच खरी शहीदांना श्रद्धांजली ठरेल," असे प्रतिपादन प्रा. डॉ. एस. एस. तोळमारे यांनी केले. राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे दिनांक २३ मार्च २०२६ रोजी शहीद दिनानिमित्त अभिवादन व आदरांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. एस. एस. तोळमारे (योगानंद स्वामी आर्ट्स कॉलेज, वसमत) तसेच प्रा. डॉ. एस. जी. बिराजदार (शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना देशभक्ती व त्यागाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शनात प्राचार्य डॉ.ए टी शिंदे यांनी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम व सामाजिक बांधिलकीची जाणीव रुजली पाहिजे तसेच शहिदांचे प्रेरणादायी आयुष्य आपल्यावर देशप्रेमाचे संस्कार घडवतात असे प्रतिपादन केले. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागामार्फत आयोजित या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. के. उमाटे यांनी तर आभार डॉ. अर्जुनसिंग ठाकूर मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी NSS स्वयंसेवक विद्यार्थी तसेच कर्मचारी डी. सी. इंगोले व संदीप गाढे यांनी मोलाचे सहकार्य केले.

स्व. अरुणकाका जगताप अन्नछत्रालयाचे उद्घाटन "काका" ट्रस्टचा उपक्रम

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

माजी आमदार स्व.अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त काका ट्रस्टच्या वतीने स्व.अरुणकाका जगताप अन्नछत्रालय सुरु करण्यात आले आहे. मार्केटयार्ड जवळील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालयाच्या समोरील नागेश्वर महादेव मंदिरात हे अन्नछत्रालय सुरु करण्यात आले आहे. बुधवार दि.२५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता या अन्नछत्रालयाचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती काका ट्रस्टचे शशीकांत घीगे यांनी दिली. अधिक माहिती देताना पूजा गोंडाळ यांनी सांगितले, स्व.अरुणकाका अन्नछत्रालयामध्ये गरजूंना दररोज सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत मोफत भोजन मिळणार आहे. या अन्नछत्राचा जास्तीत जास्त गरजूंनी रोज लाभ घ्यावा. नगरसेवक विकी जगताप म्हणाले, अरुणकाका जगताप यांनी आयुष्यभर अन्नदान केले. त्यांच्या पाश्च्यात त्यांचे कार्य पुढे नेण्यासाठी हा उपक्रम सुरु करत आहोत. यासाठी काका ट्रस्टचे सर्व पदाधिकारी सहकार्य करत आहेत.

नेवासा तालुक्यात ट्रान्सपोर्ट व्यवसाय जीवघेणा?

नेवासा : (समर्थ गांवकरी)

नेवासा तालुक्यात ट्रान्सपोर्ट व्यवसाय गंभीर स्वरूप धारण करत असल्याचे चित्र समोर येत आहे. तालुक्यातील अनेक व्यावसायिक आपल्या व्यवसायासाठी जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या अहिल्यानगर येथून माल खरेदी करतात. हा माल नेवासा येथे पोहोचवण्यासाठी काही डेली ट्रान्सपोर्ट सेवा कार्यरत आहेत. मात्र, याच सेवांमधून गंभीर अनियमितता होत असल्याची माहिती पुढे आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही ट्रान्सपोर्ट वाहनांवर अल्पवयीन तसेच वैध ड्रायव्हिंग लायसन्स नसलेले चालक नियुक्त केले जात आहेत. याशिवाय, काही चालक मद्यपान अथवा अमली पदार्थांच्या प्रभावाखाली वाहन चालवत असल्याचेही समोर आले आहे. या प्रकारामुळे रस्ते सुरक्षा धोक्यात येत असून अपघातांची शक्यता वाढली आहे. अशा परिस्थितीत, जर एखादा गंभीर अपघात घडला तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची, हा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रशासनाला या बाबींची माहिती आहे का? आणि माहिती असूनही कारवाई होत नसेल, तर संबंधित यंत्रणेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. दररोज घडणाऱ्या अपघातांमागे ही कारणे आहेत का, याची सखोल चौकशी होण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच, अल्पवयीन किंवा परवाना नसलेल्या चालकांकडे वाहने सोपवणाऱ्या ट्रान्सपोर्ट मालकांवरही कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. हा विषय केवळ व्यवसायापुरता मर्यादित नसून सर्वसामान्य नागरिकांच्या जीविताशी संबंधित असल्याने तातडीने उपाययोजना होणे गरजेचे आहे. आता या संपूर्ण प्रकरणावर अहिल्यानगर प्रशासन कोणती पावले उचलते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा येथील १९७६ च्या इयत्ता १० वीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा दि. २१ मार्च २०२६ रोजी ए स्टार हॉटेल व विद्यालय परिसरात उत्साहात पार पडला. या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल कोअर कमिटीचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे मनापासून आभार मानले.

तब्बल ५० वर्षांनंतर वर्गमित्र पुन्हा एकत्र आल्याने या कार्यक्रमाला विशेष भावनिक रंग चढला. सुरुवातीला ए स्टार हॉल येथे चहा-पानाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर विद्यालयात आयोजित छोटेखानी कार्यक्रमाच्या सुरुवातीला कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य दिलप भुजबळ सर होते. त्यांनी उपस्थितांचे स्वागत करत गेल्या पन्नास वर्षांतील शाळेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. आधुनिक तंत्रज्ञान, विशेषतः एआयच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण व स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. शाळेतील बदल पाहून माजी विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या बॅचमध्ये एकूण ११० विद्यार्थी होते, त्यापैकी २७ जणांचे निधन झाले असून, त्यांना यावेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रशासन सेवा, राजकारण, समाजकारण, बँकिंग, कृषी विभाग, उद्योग-व्यवसाय तसेच सहकार क्षेत्रात त्यांनी ठसा उमटवला आहे. अनेकांनी शेती, दुग्धव्यवसाय, पोल्ट्री, प्रक्रिया उद्योग, हॉटेल व्यवसाय, ज्वेलरी, किराणा, मेडिकल व कापड व्यवसायातही प्रगती साधली आहे.

सध्या बहुतेक जण नोकरी-व्यवसायातून निवृत्त होऊन आयुष्यातील जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडत समाधानाने जीवन व्यतीत करत आहेत. चार-पाच दशकांनंतर भेटणाऱ्या मित्रांमध्ये एकमेकांविषयी उत्सुकता व आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रमात उपस्थित सर्वांना गुलाबपुष्प व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. पांडुरंग खेतमाळीस, शशिकांत आंधळकर, रामदास घोडेकर, भास्कर नरके, दत्तात्रय शिंदे, सतीश बोरा, रमेश बोरा, राजेंद्र दंडनाईक, सुनील गांधी, दीपक घोडके, विनायक कोथिंबीरे, शिलास गरुड, अनंत फडणीस, डॉ. अशोक खेंडके, मल्हारी खंडागळे, किसन बोरुडे आदींनी कोअर कमिटीच्या माध्यमातून विशेष परिश्रम घेतले. दुपारी सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. तसेच सतीश बोरा यांनी त्यांच्या ज्वेलर्स दुकानात सर्वांना सप्रेम भेटवस्तू देऊन सन्मानित केले. या उपक्रमामुळे कार्यक्रमाची रंगत अधिक वाढली. यावेळी ॲड. पांडुरंग आनंदा खेतमाळीस यांनी शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत १ लाख ११ हजार रुपयांची देणगी जाहीर केली. याबद्दल शाळेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

मात्र, काळ बदलला असला तरी मैत्रीचे नाते आणि जुन्या आठवणींची उब कायम असल्याचे या मेळाव्यातून अधोरेखित झाले. पुढील पिढी संस्कारी व सक्षम घडल्याचे समाधानही उपस्थितांनी व्यक्त केले. या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने सर्व वर्गमित्रांना निरोगी, आनंदी आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

केडगाव अवैध गॅस रिफिलिंगची चौकशी करून दोषींवर कारवाई करा : आमदार काशिनाथ दाते

पारनेर : (समर्थ गांवकरी)

मंगळवार दि. २४ मार्च २०२६ अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न क्रमांक २३२२१ अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील केडगाव बायपास परिसरात उघडकीस आलेल्या अवैध एलपीजी गॅस रिफिलिंग प्रकरणावर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी विधानसभेत आवाज उठवत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली. आमदार दाते म्हणाले केडगाव बायपासलगत अनुराग टायरच्या गोदामामध्ये चाकणवरून अहिल्यानगर, संभाजीनगरला गॅस वाहतूक करणाऱ्या गॅस टँकरमधून अनधिकृतपणे एलपीजी गॅस रिफिलिंग केले जात होते. हा प्रकार अनेक दिवसांपासून सुरू असल्याचे समोर आले असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस अधिकाऱ्यांच्या कारवाईदरम्यान रात्री उशिरा छापा टाकून रंगेहाथ चार आरोपींना अटक करण्यात आली, तर दोन आरोपी फरार असल्याचे निदर्शनास आले. मात्र अटक झालेल्या आरोपींना जामीन मिळाल्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर आमदार दाते यांनी सरकारला थेट प्रश्न विचारत, "अटक केलेल्या आरोपींना मिळालेला जामीन रद्द करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार का?" असा सवाल उपस्थित केला. तसेच, हा अवैध प्रकार संबंधित कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत सातत्याने सुरू असताना स्थानिक पोलिसांची जबाबदारी निश्चित करून त्यांची चौकशी करण्यात येणार का आणि दोषी आढळल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली जाणार का, असेही त्यांनी स्पष्टपणे विचारले. यावेळी राज्य शासनाच्या वतीने उत्तर देताना सांगण्यात आले की, पोलिसांनीच या प्रकरणाचा छडा लावून कारवाई केली असून संबंधित ठिकाणी छापे टाकून आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच, इंधन चोरी सारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष पथके तयार करण्यात आली असून अवैध गॅस व इंधन व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सातत्याने कारवाई सुरू आहे. संबंधित कायद्यांनुसार पुढील कठोर कारवाई करण्याबाबतही विचार सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र पोलिसांचा थेट सबंध आहे किंवा काय याचा शोध घेतला जाईल. आमदार काशिनाथ दाते यांनी या चर्चेतून अवैध गॅस रिफिलिंगसारख्या धोकादायक प्रकारांवर कठोर नियंत्रण ठेवण्याची गरज अधोरेखित करत, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने अधिक दक्ष राहावे, अशी ठाम भूमिका मांडली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

सातपुड्याच्या जंगलात कृत्रीम पाणवठे !

- प्राण्यांसाठी पालच्या वन्य जिव विभागाची मोहीम
- रावेर तालुक्यात वन्यजीवांच्या सुरक्षिततेसाठी सरसावले पाल वन्यजीव वनविभाग

रावेर : (समर्थ गांवकरी)

पाल ता रावेर सध्या जिल्ह्यात तापमान दिवसेंदिवस वाढत असून यामुळे जंगल परिसरातील जलस्रोत आटून ,वन्य जिवांना पाणी टंचाईच्या झळा जाणवु लागल्या आहेत . यात एप्रिल आणि मे महिन्यात जंगल परिसरातील नदी, झरे , नैसर्गिक पानवटे पूर्णतः सुकलेले असतात यामुळे जंगलातील पशुपक्षी व वन्यप्राणी यांची पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते. पिण्याच्या पाण्याची समस्येमुळे वन्य प्राण्यांची भटकंती होते. या समस्येमुळे वन्यप्राणी लोकवस्तीकडे वळण्याची भीती निर्माण होते. याची खबरदारी म्हणून जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत वन्य प्राण्यांना पाणी पिण्यासाठी कृत्रिम पानवटे द्वारे पिण्याच्या पाण्याची पाल वन्यजीव वनक्षेत्रात एकूण ३८ कृत्रिम पानवटे आहेत.वन्य प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी वन विभाग सरसावले आहे.यावल वन्यजीव वन विभागातर्फे वनपरिक्षेत्रात कृत्रिम पानवट्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.जणेकरून या कुत्रिम पानवठयामुळे वन्य प्राण्यांची पिण्याची पाण्याची समस्या दूर होऊन वन्यप्राणी मानवी लोकवस्तीकडे न जाता जंगल परिसरातच आपली तहान व उपजीविका भागवू शकेल.

वन्य प्राण्यांचे भटकंती थांबवावी, यासाठी वनपरिक्षेत्रांतर्गत कृत्रिम पाणवठे स्वच्छ करून पिण्याचे पाणी टँकरद्वारे भरले जात आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांना पिण्यास पाणी मिळेल. वन विभागाचे कर्मचारी वेळोवेळी टँकरद्वारे हे पानवठे भरतात व त्यातील गाळ काढून ते स्वच्छ देखील करतात.

वनपपरिक्षेत्रातील वन्य प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी विशेष मार्गदर्शक सूचना वन विभागातील वनरक्षक, वनपाल, वनमजूर यांना वन्यजीव वनक्षेत्रपाल (पाल) श्रीमती शीतल नगराळे यांच्या तर्फे देण्यात आल्या आहेत.

यावल वन्यजीव वनपरिक्षेत्रात बिबट, अस्वल, कोल्हा,वाघ,निलगाय,हरिण, सांबर, चौसिंगा,ससा, लांडगा,रानडूकर,जंगली मांजर हे वन्यप्राणी तसेच मोर, सुतार पक्षी,बगळा, बदक, होलगी, चिमणी,घार ,तितर ,पोपट, रान कोंबडी, बुलबुल,कावळा, कोतवाल अशा अनेक प्रकारचे वन्यप्राणी व पशुपक्ष्यांच्या सहवास या अभयारण्यात आहे. या सर्व पशुपक्षी व वन्य प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी वन विभागातर्फे विशेष उपाय योजना करण्यात आलेल्या आहे.

जंगलात प्राण्यांना पाणी वेळेवर उपलब्ध करून दिल्यास ते मानवी वस्तीकडे वळणार नाही. यामुळे मानव व वन्यप्राणी संघर्ष कमी करता येईल.

- शितल नगराळे
वन परिक्षेत्र अधिकारी
(वन्यजीव पाल.)

शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम

वैजापुर : (समर्थ गांवकरी)

लांडेवस्ती (केंद्र - डवाळा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाचा कलाविष्कार हा कार्यक्रम विवीध सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपन्न झाला - प्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन केले. मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर यावेळी गणपती गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली त्यानंतर गिरीश का गाना सुनेगा , स्कुल चले हमे, अंगात आल या... , शाळा मराठी माझी शाळा, झुकेगा नही साला, बाईपण भारी देवा, मै तो कोल्हापुर से आई हूँ , साडीला सर्फ लाऊन धुवुन टाक, बोलो तारा रारा, ओ हो हो तारे गीन, डिपारी डिपांग, देशभक्ती पर गीत, युगात मांडली, मराठ्यांची पोरं, आम्ही शिवकन्या, आदिवासी ओ माझा रे, रंगीला, आपत्ती यारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर , कुणी नाही केल, तुफानातले दिवे, चक धुम घुम, काला चष्मा, कृष्ण मुरारी, तेलगु गीत, बानू, सावित्रीबाई फुले, केळे वाली मी, कोळी गीत कार्याला येतय गं... आई तुझे देऊळ, शिव तांडव, येऊ कशी कशी मी नांदायला, मल्हारी, यासह विविध हिंदी, मराठी गीतांनी कलाविस्कार कार्यक्रमाला रंग त आपली. कार्यक्रमासाठी, मुख्याध्यापक सुमेध सरकटे, प्रविण म्हस्के, शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजी लांडे, श्रीमती वैशाली सुराशे यांनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमास नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, जिल्हा परिषर सदस्य पंकज ठोंबरे पंचायत समिती सदस्य राहुल लांडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत त्रिभुवन, जगन्नाथ त्रिभुवन, नानासाहेब जाधव गुरुजी, नारायण साळुंखे, विशाल साळुंखे, बाबासाहेब लांडे यासह पालक व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये निवड

राजुरी : (समर्थ गांवकरी)

महारिया चॅरिटेबल ट्रस्ट संचलित सह्याद्री व्हॅली कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी राजुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये इंजिनिअरिंगच्या एकूण २२ गुणवंत विद्यार्थ्यांची जागतिक स्तरावरील नामांकित कंपनीमध्ये निवड झाली. यामध्ये सॅमसंग समूहाचे हर्मन इंटरनॅशनल सॅमसंग कंपनी आणि जॉन डियर ग्रुपची विरिटेगन इंडिया या कंपन्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. महारिया चॅरिटेबल ट्रस्टचे खजिनदार सचिन चव्हाण, संचालक के.आर.भानुशाली आणि कॉलेजच्या अकॅडमीक डी.पी.बालारामडू यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड प्रक्रिया उत्साहात पार पडली. या यशाबद्दल सविस्तर माहिती देताना महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर (TPO) प्रा. मुरलीधर कुरकुटे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील इंजिनिअरिंग आणि तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट सॅमसंग आणि जॉन डियर सारख्या आंतरराष्ट्रीय समूहासोबत काम करण्याची संधी मिळणे ही संस्थेसाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले.

कॅम्पस भरती प्रक्रियेमध्ये लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत आणि मानव संसाधन (HR) मुलाखत अशा विविध टप्प्यांचा समावेश होता. या सर्व टप्प्यांमध्ये सह्याद्रीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपली गुणवत्ता सिद्ध केली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये उज्ज्वल करिअरच्या संधी उपलब्ध होणार आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रशिक्षण व प्लेसमेंट विभाग प्रमुख तसेच सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांच्या या यशामागे महाविद्यालयातील गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रशिक्षण कार्यक्रम आणि उद्योगाभिमुख उपक्रमांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले.

११ प्रवेशासाठी जूळवा-जूळव करावी

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

नांदेड इयत्ता 10 वीची परीक्षा 18 मार्च रोजी संपली आहे. दहावीच्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांना आता पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणजे इयत्ता 11 वीसाठी प्रवेश घेणे. मागील वर्षापासून राज्यभर इयत्ता 11 वीचे प्रवेश हे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे झालेले होते. त्यानुसारच यंदा देखील सन 2026-27 साठी इयत्ता 11 वीचे प्रवेश ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारेच होणार आहेत. त्यामुळे इयत्ता 10 वीच्या विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी प्रवेश प्रक्रिया सूरू होण्यापूर्वी कागदपत्रांची जूळवा-जूळव करुन घेणे व आवश्यक पूर्व तयारी करण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी माध्यमीक माधव सलगर यांनी केले आहे. येत्या काही कालावधीत इयत्ता 11 वीची प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने नवीन पोर्टल कार्यान्वित होणार असून याद्वारे कॉलेजचे रजिस्ट्रेशन करणे, शाखा व विषयांची नोंदणी करण्याचे काम कॉलेजला करावयाचे असून त्यानंतर लगेचच विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन करण्यासाठी पोर्टल कार्यान्वित होणार आहे.

८५० ग्रॅम वजनाच्या अतिदुर्मिळ प्रीमॅच्युअर बालिकेला जीवनदान

पुणे : (समर्थ गांवकरी)

मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे येथील अत्याधुनिक नवजात अतिदक्षता विभागाच्या (एनआयसीयू) मदतीने केवळ ८५० ग्रॅम वजनाच्या आणि अत्यंत गंभीर अवस्थेत जन्मलेल्या नवजात बालिकेला यशस्वीरित्या जीवनदान देत डिस्चार्ज देण्यात आला आहे. ही घटना आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि तज्ज्ञांच्या समन्वयित प्रयत्नांचे उत्कृष्ट उदाहरण ठरली आहे. ही बालिका अवघ्या २६ आठवडे ४ दिवसांच्या गर्भावस्थेत जन्माला आली होती. जन्मानंतर तिला तातडीने ९ जानेवारी २०२६ रोजी एनआयसीयूमध्ये दाखल करण्यात आले. बालिकेची आई मंगला भांगे (वय ४३ वर्षे) यांना पूर्वी अनेक वैद्यकीय गुंतागुंतींचा सामना करावा लागला होता. आयव्हीएफ अपयश, खराब प्रसूती इतिहास, उच्च रक्तदाब, गर्भावस्थेतील मधुमेह (GDM), हायपोथायरॉईडिझम आणि सर्व्हिकल इनकॉम्पिटन्स यांसारख्या समस्यांमुळे ही प्रसूती अतिजोखमीची ठरली होती. प्री-एक्लेम्पसियामुळे परिस्थिती आणखी गंभीर बनली होती. ही गुंतागुंतीची प्रसूती डॉ. मधुश्री माने आणि डॉ. शारयू यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. त्यानंतर बालिकेच्या उपचारांची जबाबदारी डॉ. दत्तात्रय कुलकर्णी (निओनॅटोलॉजिस्ट) यांनी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली एनआयसीयू टीमने अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत उपचार करत बालिकेची प्रकृती स्थिर केली. उपचारादरम्यान बालिकेला अनेक गंभीर समस्यांचा सामना करावा लागला. त्यामध्ये रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम (RDS) साठी सर्फॅक्टंट, एनआयव्ही, सीपॅप आणि तब्बल २६ दिवस ऑक्सिजन सपोर्ट देण्यात आला. तसेच सबगेलियल ब्लीड, ॲसिनेटोबॅक्टर सेप्सिस, हेमोडायनामिकली सिग्निफिकंट पीडीए, एपनिया ऑफ प्रीमॅच्युरिटी आणि ऑस्टिओपेनिया ऑफ प्रीमॅच्युरिटी यांसारख्या गुंतागुंतींचे यशस्वी व्यवस्थापन करण्यात आले. संपूर्ण उपचार काळात आईच्या दुधावर आधारित पोषण देण्यात आले. सुमारे दोन महिन्यांच्या अथक उपचारानंतर बालिका ३५ आठवडे २ दिवसांच्या करेक्टेड गर्भावस्थेपर्यंत पोहोचली असून तिचे वजन वाढून १८२५ ग्रॅम झाले आहे. डिस्चार्जपूर्व तपासणीत ग्रेड १ पीव्हीएल, झोन ३ आरओपी (निरीक्षणाखाली) असून इको अहवाल सामान्य आढळला आहे. सध्या बालिकेची प्रकृती स्थिर असून तिला १० मार्च २०२६ रोजी यशस्वीरित्या डिस्चार्ज देण्यात आला. या यशामागे एनआयसीयूतील डॉक्टर, आरएमओ, नर्सिंग स्टाफ आणि संपूर्ण वैद्यकीय टीमचे समन्वयित व समर्पित प्रयत्न महत्त्वाचे ठरले.

नाशिक शिंपी समाज एकता महिला मंडळातर्फे पुरस्कार सोहळा संपन्न

नाशिक : (समर्थ गांवकरी)

नाशिक सिडको येथील शिंपी समाज एकता महिला मंडळातर्फे महाराष्ट्र राज्य मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा ग्रुप चा सौजन्याने आला. नाशिक सिडको येथील लक्ष्मीधवल कार्यालयात "रणरागिनी पुरस्कार सोहळा २०२६" चे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचा अध्यक्ष म्हणून शिंपी समाज एकता महिला मंडळाचा अध्यक्षा सौ.माया मिलिंद चव्हाण संकल्पनेनुसार, ॲड.गीतांजली बागुल, अखिल भारतीय शिंपी समाज महिला कार्याध्यक्षा सुनिता शिंपी व ज्येष्ठ समाजसेवक उद्योजक श्री. जयराम मुरलीधर चव्हाण यांचा प्रमुख उपस्थितीत पुरस्कार सोहळा पार पडला.यावेळी शिंपी समाज एकता महिला मंडळातील शिंपी समाजातील विविध क्षेत्रात उद्योग व्यवसाय नोकरी करून समाजसेवा करण्यासाठी तत्पर आणि कुटुंबासाठी हातभार लावणाऱ्या ३५ हिरकणींचा,"रणरागिणी पुरस्कार २०२६"देऊन सन्मान करण्यात आला. एकता महिला मंडळाचा उपाध्यक्षा वंदना जगदाळे , सचिव शर्मिला जगताप व खजिनदार शोभा संन्यांशी मंडळाचा प्रवक्त्या सीमा कापडणे मंडळाचा सदस्य प्रतिभा बिरारी,रेखा निकम, भारती भामरे,सुनीता गवांदे इंदिरा, खैरनार, अनिता बाविस्कर,ललिता बोरसे, कल्पना कटके,भारती महाजन,सुरेखा ब्राह्मणकर यांनी विशेष सहकार्य केले. ॲड.गीतांजली बागुल यांनी एकता महिला मंडळाचा या उपक्रमांचे कौतुक करत पुरस्कार प्राप्त सर्व समाज भगिनींचे अभिनंदन केले.मंडळाचा अध्यक्षा माया चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा ग्रुपचे अनमोल सहकार्य लाभले त्याबद्दल आभार व्यक्त केले.आपल्या समाजातील सर्व महिलांनी समाजातील गरजू भगिनींना एकत्र करून सामूहिक उद्योग व्यवसाय कसे सुरू करता येतील यासाठी एकात्मता दाखवून समाज भगिनींना सक्षम करण्यासाठी क्रांतीज्योती सावित्री बाई फुले, राजमाता जिजाऊ,अहिल्याबाई होळकर,झाशीची राणी लक्ष्मीबाई ,यांचा आदर्श समोर ठेवून कार्य करावे असे आव्हान केले. कार्यक्रमाचा शेवटी उपस्थित सर्व मान्यवर व पुरस्कार प्राप्त रणरागिणींचे आभार मानले. व अल्पोहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

प्लेसमेंट ड्राईव्ह व रोजगार मेळावा

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

नांदेड दि. २४ मार्च जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माहूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार 27 मार्च 2026 रोजी हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माहूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या प्लेसमेंट ड्राईव्ह /रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधी साठी मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी शुक्रवार 27 मार्च 2026 सकाळी 10 वा. पासून हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माहूर येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा.

हिमायतनगर तालूक्यात ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत पोलीसांची कारवाई

पावनेपाच लाखाचा गुटखा जप्त. पोट्यात दुसऱ्यांदा मोठी कारवाई

हिमायतनगर : (समर्थ गांवकरी)

तालूक्यातील पोटा बु. येथून महाराट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, सुगंधीत पानमसाला यावर छापा मारून पोलीसांनी पावनेपाच लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई ता.२३ रात्री उशिरा करण्यात आली आहे. आठवड्यातील हि दुसरी मोठी कारवाई मानली जात आहे.

हिमायतनगर तालूक्यात शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची मोठ्या प्रमाणात साठा, विक्री होत आहे. या पाश्वभूमिवर ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत ता. २३ मार्च रोजी रात्री उशिरा पोटा बु. येथून शेख बाबा वलीसाहब यांच्या टिनपत्राच्या घरात साठवणूक केलेला गोवा- १००० पानमसाला, वजिर केसर युक्त, जि आय जर्दा,बाजीराव पान मसाला,सुगंधी पानमसाला,टोबॅको आदिसह विविध कंपन्याचा गुटखा साठ्यावर पोलीसांनी छापा मारून ४ लाख ८८ हजार तिनशे रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक अविनाशकुमार,अप्पर पोलीस अधिक्षक अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक सुरज गुरव व उप विभागीय पोलीस अधिकारी डि. एस. हाके, पोनि. अमोल भगत यांच्या मार्गदर्शनागाली सहाय्यक पोलीस निरिक्षक विशाल वाठोरे, सपोनि मिलिंद कात्रे, पोहेकाँ. बालाजी पाटील, पो. कॉ. सपना सुर्यवंशी, यांनी हि कारवाई केली आहे. आठवड्यातील हि दुसरी कारवाई आहे. पोटा बु. येथूनच ता. १८ रोजी एलसीबीच्या पथकाने सव्वा लाखाचा गुटखा साठा जप्त कारवाई केली होती. पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांनी जिल्हाभरात या कारवाईची मोहीम हाती घेतली असून, अनेक ठिकाणी मोठ्या कारवाया करण्यात आल्या आहेत. परंतू हिमायतनगर शहरातील ते दोन्ही गुटखा किंग अद्याप हि मोकाटच आहेत. पोहेकाँ. श्यामसुंदर नागरगोजे यांच्या फिर्यादीवरून आरोपी सय्यद सत्तार सय्यद कादर वय ४८ वर्ष रा. पोटा बु. ता. हिमायतनगर यांच्या विरूद्ध हिमायतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास हिमायतनगर पोलिस करित आहे.

'कल्चर सर्कल'चे आगमन; लक्झरी रिटेल विस्ताराला नवी चालना

पुणे : (समर्थ गांवकरी)

आशियातील आघाडीचा हायप आणि लक्झरी फॅशन प्लॅटफॉर्म 'कल्चर सर्कल'ने पुण्यात आपले पहिले फ्लॅगशिप स्टोअर सुरू करत रिटेल क्षेत्रात नवी पायरी गाठली आहे. कोपा मॉलमधील ब्रॉडवे येथे २१ मार्च २०२६ रोजी या स्टोअरचे उद्घाटन करण्यात आले. शहरातील प्रीमियम लाइफस्टाइल हबमध्ये उघडलेले हे स्टोअर कंपनीच्या ऑफलाइन विस्तार धोरणातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. हे स्टोअर ग्राहकांना एक संपूर्ण लक्झरी शॉपिंग अनुभव देण्यासाठी खास डिझाइन करण्यात आले आहे. येथे प्रीमियम स्नीकर्स, लक्झरी हँडबॅग्स, उच्च दर्जाची घड्याळे आणि लोकप्रिय स्ट्रीटवेअर यांचा मोठा संग्रह उपलब्ध आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील एर्मेस, लुई वितों, शॅनेल आणि डिओर यांसारख्या ब्रँड्ससोबतच एअर जॉर्डन, यीजी, नायकी डंक आणि न्यू बॅलन्स यांसारखे लोकप्रिय स्नीकर्सही ग्राहकांना येथे मिळणार आहेत. ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यासाठी स्टोअरमधील प्रत्येक उत्पादनाची विशेष ऑथेंटिकेशन प्रणालीद्वारे तपासणी केली जाते.

बनाई देवी यात्रा उत्सवानिमित्त भव्य निकाली कुस्त्यांचा हगामा संपन्न

पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील जागृत ग्रामदैवत माता बनाई देवी यात्रा उत्सव यंदा मोठ्या उत्साहात आणि भव्यतेने साजरा झाला. पंचक्रोशीतील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या या देवस्थानाची यात्रा दरवर्षीप्रमाणे गुढीपाडव्याच्या तिसऱ्या दिवसापासून सुरू होऊन २१ ते २४ मार्च २०२६ या कालावधीत विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांनी रंगली. यात्रेच्या मुख्य आकर्षणांपैकी एक म्हणजे भव्य निकाली कुस्त्यांचा हगामा, ज्यात नामवंत पैलवानांनी आपल्या कौशल्याने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

श्री बनाईदेवी सार्वजनिक यात्रा उत्सव समितीने आयोजित केलेल्या या कुस्ती स्पर्धेत नामवंत पैलवानांनी भाग घेतला. मुख्य कुस्त्यांमध्ये पैलवान महेश फुलमाळी विरुद्ध पैलवान आकाश चव्हाण यांची ३१ हजार रुपयांची, पैलवान अंकित धुळगंड विरुद्ध पैलवान ऋत्विक बिन्नर यांची २५ हजार रुपयांची, पैलवान रोहन परदेशी विरुद्ध पैलवान गोवर्धन शिंदे यांची २१ हजार रुपयांची आणि पैलवान अवि साळवे विरुद्ध पैलवान रामा सुरडकर यांची २१ हजार रुपयांची कुस्ती झाली. याशिवाय पैलवान सार्थक वाळुंज विरुद्ध पैलवान कुमार देशमाने (१५ हजार रुपये), पैलवान अतुल नाईकल विरुद्ध पैलवान गणेश फडके (११ हजार रुपये), पैलवान दिनकर पवार विरुद्ध पैलवान भाऊसाहेब वरे (११ हजार रुपये), पैलवान सौरभ मराठी विरुद्ध पैलवान पवन डोनर (१० हजार रुपये) अशा अनेक आकर्षक जोड्या रिंगणात उतरल्या. या स्पर्धा प्रेक्षकांनी प्रचंड उत्साहाने पाहिल्या.

विजेत्या पैलवानांना यात्रा कमिटीचे अध्यक्ष पै. संपत शेठ तराळ आणि उपसरपंच टाकळी ढोकेश्वर रामभाऊ तराळ यांच्यावतीने आकर्षक चषक प्रदान करण्यात आले. तसेच मराठा महासंघ पारनेर तालुका अध्यक्ष विक्रम शेठ झावरे आणि बबलू शेठ जयसिंग झावरे पाटील यांच्यातर्फे मानाची गदा बक्षीस म्हणून देण्यात आली. या बक्षिस वितरणाने पैलवानांमध्ये जोम निर्माण झाला आणि प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात विजेत्यांचा सत्कार केला. बनाई देवी सार्वजनिक यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष संपतराव तराळ आणि उपाध्यक्ष संजय खिलारी (मेजर) यांच्या कुशल नेतृत्वाखाली हा संपूर्ण उत्सव शांततेत आणि भव्यतेने पार पडला. चार दिवस चाललेल्या यात्रेत कुठलेही गालबोट लागले नाही. कुस्त्यांच्या हगाम्याच्या दिवशी उपसरपंच किरण तराळ, अशोक कटारिया, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, पोपटशेठ कटारिया, डॉ. दीपक आहेर, जिल्हा प्रवक्ते मोहनराव रोकडे, महसूल अधिकारी शरद झावरे, सुभाष वराळ पाटील, बबलू शेठ झावरे, माजी उपसभापती विलास झावरे, सामाजिक कार्यकर्ते श्रावण गायकवाड, प्रकाश चिकणे, रसिक शेठ कटारिया, ग्रामपंचायत सदस्य दत्ता निवडूंगे, पत्रकार शरद झावरे, अविनाश पायमोडे, साहिल शिंदे, प्रकाश इघे, यांच्यासह जिल्हाभरातील कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात्रा यशस्वी करण्यासाठी समितीचे अध्यक्ष संपतराव तराळ, उपाध्यक्ष संजय खिलारी मेजर, बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळशिरम पायमोडे, विक्रमशेठ झावरे, अंकुशशेठ पायमोडे, मळीभाऊ रांधवन, विकास आल्हाट आणि संपूर्ण यात्रा कमिटी टाकळी ढोकेश्वर यांनी विशेष परिश्रम घेतले. यात्रेच्या सुरक्षेसाठी पारनेर पोलिस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी कडक बंदोबस्त ठेवला होता, ज्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. टाकळी ढोकेश्वरची बनाई देवी यात्रा केवळ धार्मिक उत्सव नसून, ती सांस्कृतिक एकतेचे आणि ग्रामीण परंपरांचे जिवंत उदाहरण आहे. कुस्ती हगाम्यासह विविध कार्यक्रमांनी यात्रा प्रेक्षकांच्या मनात अमिट ठसा उमटवून गेली. गावकऱ्यांसह परिसरातील भाविकांनी या उत्सवात सहभाग घेतला आणि भविष्यातही अशा भव्य उत्सवांची अपेक्षा व्यक्त केली.

"आनंदी जीवन" या व्याख्यानास उस्फूर्त प्रतिसाद

सक्षम निर्णय, सकारात्मक विचार व आत्मविश्वास यशाची त्रिसूत्री : प्रेरणादायी वक्ते व लेखक दत्तात्रय वारकड

अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)

धावपळीच्या युगामध्ये डिजिटल युग,ए आय सोशल मीडिया यांचा वाढता प्रभाव यामुळे जीवन अत्यंत वेगवान झाले आहे. अशा या धावपळीच्या जीवनामध्ये मानसिक सुखशांती, समाधान आणि आनंदी जीवन जगण्यासाठी सकारात्मक विचारांचे अनुकरण करणे आवश्यक आहे. विचार जीवनावर तर कल्पना जगावर राज्य करतात. जीवनामध्ये नकारात्मक गोष्टींना थारा न देता सकारात्मक गोष्टीवरती जास्तीत जास्त ध्यान आकर्षित करून जीवनामध्ये यश मिळवण्याकरिता सकारात्मक विचारांचा अविष्कार करावा. पुस्तकांचे वाचन केल्याने जीवना कडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होतो.कर्तव्यपूर्ती करताना आत्मविश्वासाने सामोरे जा.जीवनात सक्षम निर्णय, सकारात्मक विचार व आत्मविश्वास यशाची त्रिसूत्री आहे.असे प्रतिपादन लेखक व प्रेरणादायी वक्ते व लेखक दत्तात्रय वारकड यांनी केले आहे.

जिल्हा पोलीस मुख्यालय अहिल्यानगर येथे जिल्हा अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी,अंमलदार व कर्मचारी यांच्यासाठी "आनंदी जीवन आयुष्याचा आनंद उत्सव, व्यक्तिमत्व विकास" या विषयावर लेखक व प्रेरणादायी वक्ते दत्तात्रय वारकड यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी,राखीव पोलीस उपनिरीक्षक विजय भोसले, सर्व पोलीस स्टेशनचे कर्मचारी व अधिकारी, आरसीएफ फोर्स,क्यू आर टी फोर्स मधील पोलीस कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या राष्ट्राच्या विकासामध्ये असलेल्या महान योगदानाबद्दल सर्व प्रथमतः वक्ते श्री वारकड यांनी उपस्थितांच्या महान कार्याला वंदन केले.सर्व पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्याचे कौतुक केले.सर्वांनी आपल्या या जोखमीच्या कार्यात व अत्यंत धावपळीच्या जीवन प्रणाली मध्ये १५ ते २० मिनिटं नियमितपणे ध्यान करणे, सकारात्मक पुस्तकांचे वाचन करणे निसर्गाच्या सानिध्यात फिरणे,सकारात्मक विचारांचे चिंतन,मनन करणे, आनंदी मन ठेवण्याकरिता आवश्यक असणारे जीवनप्रणाली चे अवलोकन करावे.

संत ज्ञानेश्वर माऊली यांनी ध्यान योगाचे महत्त्व विशद केले आहे.या बाह्य जग जगतापेक्षा कितीतरी विस्तीर्ण मोठे जग आपल्या अंतरात्म्यामध्ये दडलेले आहे. त्याकरिता ध्यान प्रक्रिया अतिशय महत्त्वाची आहे ."

विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले, अवघेचि जाहले देह ब्रम्ह" याप्रमाणे पंधरा ते वीस मिनिटं ध्यान करण्याचे आवाहन लेखक व प्रेरणादायी वक्ते श्री दत्तात्रय वारकड यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर : रंगणार बैलगाड्यांच्या शर्यतीचा थरार

पारनेर : (समर्थ गांवकरी)



तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील जागृत ग्रामदैवत माता बनाईदेवी यात्रेत यंदा बैलगाड्यांच्या शर्यतीचा मोठा थरार रंगणार आहे. यात्रा कमिटीने मंगळवार दि. २४ मार्च ते बुधवार २५ मार्च २०२६ या दोन दिवसांत सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले आहे. यात्रा कमिटीचे अध्यक्ष संपतराव तराळ, बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे, अंकुश पायमोडे, विक्रम झावरे आणि मळिभाऊ रांधवण यांनी याबाबत माहिती दिली. बैलगाडा शर्यतींसाठी एकूण दोन लाख रुपयांपर्यंत आकर्षक बक्षीस ठेवण्यात आले आहे. शर्यतीत प्रथम क्रमांकासाठी ७१ हजार एक रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ५१ हजार एक रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ३१ हजार एक रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. याशिवाय एक नंबर फायनलसाठी १५ हजार, दोन नंबर फायनलसाठी ११ हजार, तीन नंबर फायनलसाठी ९ हजार, चार नंबर फायनलसाठी ७ हजार, पाच नंबर फायनलसाठी ५ हजार रुपये बक्षीस दिले जाणार आहेत. तसेच घाटाचा राजा स्पर्धेसाठी ५१०० रुपये, शर्यतीतील आकर्षक प्रथम फळीफोड (बारी) गाड्यासाठी ५ हजार रुपये आणि द्वितीय फळीफोडसाठी ३ हजार रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे.

यात्रेच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी ८ वाजता काठी मिरवणूक, रात्री ८ वाजता भव्य छबिना मिरवणूक आणि रात्री १० वाजता अमर पुणेकर प्रस्तुत 'नटखट सुंदरा' ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाने चार दिवसीय बनाईदेवी यात्रेची सांगता होणार आहे. बैलगाडा शर्यतीत जिल्हाभरातील नामवंत बैलजोडी सहभागी होणार असून, प्रेक्षकांना दोन दिवस थरारक अनुभव मिळणार आहे. यात्रा कमिटीने सर्व तयारी पूर्ण केली असून, शर्यती सुरळीत व सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

राम जन्म उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

(समर्थ गांवकरी)

आवेकर भावे रामचंद्र संस्थान ट्रस्ट राम मंदिर आळंदी देवाची या ठिकाणी गुरुवार दिनांक १९मार्च २०२६ ते गुरुवार दिनांक २६ मार्च २०२६या कालावधीमध्ये राम मंदिरात संगीत, नृत्य,भजन नारदिय कीर्तन या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

रोज सकाळी ७ते ८ या वेळात वेद पाठशाला आळंदी यांच्यामार्फत रुद्र अभिषेकाचे मंत्र पठण केले जाते.त्याच बरोबर १९ तारखेपासून भरतनाट्यम डॉ. परिमल फडके परिमल परफॉर्मिंग आर्ट अँड रिसर्च सेंटरच्या विद्यार्थ्यांनी सादर केला.शब्दविणे संवादू भक्ती पूर्व वाद्य संगीत पंडित रमाकांत पराजपे,अभंग वाणी व भावगीत हरिभक्त पारायण ज्ञानेश्वरी ताई रोकडे महाराज,राम कृष्णजी गरड महाराज,सौ मुक्ता कुलकर्णी गरसोळ,,रामलीला

सई देशपांडे,गजर रामनामाचा नितीन आवेकर,सेक्सोफोन वादन श्री.संजय भावे,संतांचिया गावा राग संगीत अभंग सौ अर्पणा केळकर,भक्ती संगीत भज मन राम अमिता घुगरी व तुषार रिठे,भजन राम पर्व ऐक ध्यास श्री हेमंत आठवले,बासरी वादन श्री अमित खरे. अभंग व भक्तीगीत सौ ज्योती गोराणे,वारकरी भजन ह. भ.प. आबा महाराज गोडसे,शास्त्रीय वायलिन वादन सौ विद्या इंगळे व सौ.रमा चोभे आत्तापर्यंत हे कार्यक्रम राम मंदिरामध्ये संपन्न झाले आहेत या सर्वांचे आवेकर भावे रामचंद्र संस्थानचे मुख्य विश्वस्त श्री राहुल आवेकर व विश्वस्त श्री अविनाश गुळुंजकर श्री अर्जुन मेदनकर,श्री लक्ष्मीकांत दंडनाईक,श्री चिन्मय चोभे,श्री रमेश मुसुडगे व सर्व माजी विश्वस्त यांच्या वतीने सत्कार करण्यात आला पुढील कार्यक्रम राम नवमीपर्यंत राम मंदिरामध्ये होणार आहे तर सर्व भक्तांनी त्याचा लाभ घ्यावा असे विश्वस्तांनी आवाहन केले आहे.

श्रीराम हे हिंदू धर्मियांचे आदर्श

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

रामनवमी म्हणजे रामाचा वाढदिवस, रामनवमी आपल्यातील दिव्य आत्म प्रकाश प्रकटीप्रित्यर्थ साजरी केली जाते. प्रभू रामचंद्र ज्याला पाहून मन रमते, आकर्षित होते, मनुष्य स्वतःला विसरून जातो, मुग्ध होतो,भारावून जातो, अशी व्यक्ती म्हणजे राम, हेच श्रीराम हिंदू धर्मियांचे आदर्श आणि लाडकं दैवत आहे.असे निरूपण राष्ट्रसेविका समिती चे वक्त्या वासंतीताई उत्पात यांनी केले. सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात राम नवमी निमित्त श्रीराम कथेचे आयोजन स्वामी समर्थ ट्रस्ट व प्रिया जानवे यांनी केले होते. यावेळी भक्तांना निरूपण करताना वासंतीताई बोलत होत्या. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तहानलेल्या पशुपक्ष्यांसाठी धावला युवक

पर्यावरण प्रेमी राहुल राऊत यांनी उभारला जीवनदायी पाणवठा!

राजूर : (समर्थ गांवकरी)

उन्हाळ्याच्या कडक उन्हामुळे माणसांसोबतच पशुपक्ष्यांचेही जीवन कठीण बनले आहे. पाण्याच्या शोधात भटकणाऱ्या पक्ष्यांचे हाल पाहून पर्यावरण प्रेमी राहुल राऊत यांचे मन हेलावले आणि त्यांनी कोणाचीही वाट न पाहता स्वतः खड्डा खोदून पशुपक्ष्यांसाठी पिण्याचा छोटा पाणवठा उभारला.

मवेशी परिसरात उभारलेल्या ऑक्सिजन पार्कमध्ये यापूर्वीच १०५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे. या हरित उपक्रमामुळे परिसरात पक्षी, खारी व लहान जनावरांचा वावर वाढला. मात्र त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याचे लक्षात येताच राहुल राऊत यांनी हा जीवनदायी उपक्रम हाती घेतला. आज या पाणवठ्यामुळे अनेक पशुपक्ष्यांना तहान भागवण्याचा आधार मिळत आहे. निसर्गासाठी केलेली ही निःस्वार्थ सेवा पाहून परिसरातील नागरिकही भावूक झाले असून समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडताना दिसत आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात सातत्य ठेवत राहुल राऊत यांनी आतापर्यंत ११५० पेक्षा अधिक झाडे लावली असून ती जगवण्यासाठीही ते प्रामाणिक प्रयत्न करत आहेत. वृक्षारोपण, जनजागृती, पशुपक्ष्यांसाठी पाणी व्यवस्था, पर्यावरण विषयक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांमुळे त्यांच्या कार्याची सर्वत्र दखल घेतली जात आहे. यावेळी त्यांनी सांगितले की, "पर्यावरणासाठी अजून जेवढे करता येईल तेवढे नक्कीच करू. पशुपक्षी जर जगले तरच पर्यावरण टिकेल आणि पर्यावरण टिकले तरच मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहील." तसेच त्यांनी सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, या उन्हाळ्यात आपल्या घराजवळ, शेतात किंवा मोकळ्या जागेत पक्ष्यांसाठी पाणी ठेवावे आणि शक्य असेल तिथे छोटे पाणवठे तयार करावेत. त्यांच्या या उपक्रमातून समाजाला एक नवा संदेश मिळत आहे ! "चला, आपण सर्व मिळून निसर्ग वाचवण्यासाठी नवी सुरुवात करूया."

हिंदू-शीख एकात्मतेचा संदेश; 'राम' हेच सर्वांचे अधिष्ठान : राधाकृष्ण जी महाराज

रामराज्यासाठी अंतर्गत एकजूट आवश्यक; पिंपळगावातील श्रीराम कथेतून प्रबोधन

तामसा : (समर्थ गांवकरी)

पिंपळगाव येथे सुरू असलेल्या श्रीराम कथेदरम्यान कथा व्यास राधाकृष्ण जी महाराज यांनी हिंदू-शीख धर्मातील एकात्मता, श्रीरामांचे सार्वत्रिक महत्त्व आणि समाजातील ऐक्याची गरज यावर प्रभावी विचार मांडत उपस्थित भाविकांना भावनिक व आध्यात्मिक संदेश दिला.

महाराज म्हणाले की, हिंदू धर्म आणि शीख धर्म हे एकमेकांना पूरक व समविचारी धर्म असून दोन्हींचे मूळ तत्त्व एकच आहे. गुरु गोविंदसिंग जी यांच्या त्यागामुळे धर्मरक्षणाची परंपरा आजही जिवंत आहे, तर गुरु तेग बहादूर आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी धर्मासाठी दिलेल्या बलिदानामुळेच आज धर्म टिकून आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

हिंदू समाजातील विविध जाती-पंथ एकत्र आले नाहीत, तर 'रामराज्य' स्थापनेचे स्वप्न अपूर्णच

राहील, असे स्पष्ट करत त्यांनी समाजातील अंतर्गत ऐक्यावर भर दिला. इंडोनेशियाचे उदाहरण देत रामाचे वैश्विकत्व अधोरेखित मुस्लिम बहुल असलेल्या इंडोनेशिया देशातही श्रीरामांचे नाव आदराने घेतले जाते. तेथील राष्ट्रीय विमान सेवा गरुडा इंडोनेशिया ही विष्णूच्या वाहनाच्या नावावर आहे, तसेच सांस्कृतिक परंपरांमध्ये रामायणाचा प्रभाव दिसून येतो, असे सांगत महाराजांनी रामाचे सार्वत्रिक अस्तित्व अधोरेखित केले.

'राम' म्हणजे त्याग, सेवा आणि प्रेमाचे प्रतीक श्रीरामांच्या जीवनातील केवट प्रसंगाचे उदाहरण देत त्यांनी सांगितले की, गरीब, दुःखी आणि साधू-संतांची सेवा करणाऱ्यांनाच खऱ्या अर्थाने रामाची कृपा लाभते. "स्वतः दुःख सहन करून इतरांना सुख देणारे नाव म्हणजे राम," असे भावनिक उद्गार त्यांनी काढले.

ज्या घरात परस्पर मान-सन्मान, आपुलकी आणि प्रेम असते, तेथेच 'रामायण' घडते, असे सांगत त्यांनी कुटुंबव्यवस्थेतील मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

नांदेड ही गुरु गोविंदसिंग जी यांच्या कार्याने पावन झालेली भूमी असल्याचा अभिमान प्रत्येकाने बाळगावा, असे आवाहन त्यांनी केले. उत्साह, आशीर्वाद आणि परस्पर सहकार्य यामुळेच कोणतेही सत्कार्य घडते, असा सकारात्मक संदेश देत महाराजांनी उपस्थित भाविकांना समाजहितासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. ही श्रीराम कथा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजाला एकत्र आणणारा, मूल्यांची जाणीव करून देणारा आणि रामतत्त्वाचा जागर करणारा आध्यात्मिक सोहळा ठरत आहे.

अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये

शिवनेरी : (समर्थ गांवकरी)

मध्यपूर्व आशिया सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जुन्नर तालुक्यातील पेट्रोल व डिझेल इंधन पुरवठ्याबाबत प्रशासनाने सतर्कता बाळगली . अशी माहिती तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी सांगितली. तालुक्यातील पेट्रोल व डिझेल बद्दल पसरलेल्या पसरलेल्या अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये. या संदर्भात पेट्रोल पंप वितरकांची बैठक तहसीलदार जुन्नर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली . त्यामध्ये इंधन साठा बाबत कोणताही तुटवडा नाही असे तालुक्यातील पेट्रोल पंप वितरकांनी सांगितले. तालुक्यातील नागरिकांनी पेट्रोल पंप व गॅस एजन्सीवर अनावश्यक गर्दी करू नये , तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये.

डॉ. विखे पाटील इंजिनीअरींग मेकॅनिकल विभागातील २१ विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे नोकरीसाठी निवड

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट विभागामार्फत मेकॅनिकल इंजिनीअरींग विद्यार्थ्यांकरीता करीअर घडवण्याच्या दृष्टीने मेकॅनिकल इंजिनीअरींग क्षेत्रातील कंपन्यांद्वारे चतुर्थ वर्ष मेकॅनिकल इंजिनीअरींग विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखती दरम्यान विद्यार्थ्यांची प्रथम योग्यता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक चाचणी आणि प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे मेकॅनिकल इंजिनीअरींग विभागातील एकुण 21 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यावेळी मेकॅनिकल इंजिनीअरींग विभागातील कु. दिप्ती पानमंद हिचे सीएई एनालायझर, पुणे या मल्टीनॅशनल कंपनीमध्ये निवड झाली. यामध्ये मे, हायटेक, लिस्टारो ग्रुप, पुणे 04, मे. लॉरेझ नुडसन, अहिल्यानगर 10,मे. राधेय मशिनरी, पुणे 09,सीएई एनालायझर प्रा. लि,पुणे-01, मे.नेलसॉफ्ट प्रा.लि. पुणे-09 में. सी.पी.एस.प्रा. लि.पुणे 08, फ्लेअर एनर्जी01, के ड्राईव्ह सुपा-02 मे. सी. जी. पॉवरअहिल्यानगर-०२, या मेकॅनिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांचा समावेश आहे.

प्रत्येक विद्यार्थ्यास प्रत्येकी दोन अशा ४२ ऑफर्स मिळाल्या असून सरासरी तीन ते चार लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज आहे.

या मुलाखतीसाठी विभागीय शिक्षक समन्वयक प्रा. दत्तात्रय नन्नवरे, ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट ऑफीसर प्रा. सुदर्शन दिवटे यांनी परिश्रम घेतले. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ.सुशील मगर, प्राचार्य डॉ. रविंद्र नवधर यांनी मार्गदर्शन केले.

या यशाबद्दल संस्थेचे डायरेक्टर टेक्निकल प्रा. सुनिल कल्हापुरे, डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील,संस्थेचे चेअरमन तथा जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री अहिल्यानगर डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या व त्यांच्या या यशाचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांकडून वाहतूक जनजागृती रॅली उत्साहात संपन्न!

नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)

एपीएमसी वाहतूक शाखेच्या वतीने दिनांक २३ मार्च २०२६ रोजी माथाडी सिग्नल येथे विद्यार्थ्यांमार्फत वाहतूक जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांसह वाहनचालकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. या रॅलीत सुमारे ३५ ते ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेटचा वापर, सीट बेल्टची सक्ती तसेच सिग्नलचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांनी फलक आणि घोषणांद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती केली. "सुरक्षित वाहतूक, सुरक्षित जीवन" हा संदेश देत नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन पीएसआय घंटे यांनी केले. तसेच बाकलीवाल फाउंडेशन स्कूल, दाना बंदर यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने रॅली काढत वाहतूक सुरक्षेबाबत प्रभावी जनजागृती केली. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता वाढण्यास मदत होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

शिर्डीच्या परवीन शेख यांची मुंबई पोलीस दलात झेप!

जिद्द, चिकाटी आणि खाकीचे स्वप्न

अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)

इच्छा तिथे मार्ग' ही म्हण आपण अनेकदा ऐकतो, पण ती प्रत्यक्षात उतरवून दाखवली आहे परवीन सांडू शेख या २२ वर्षीय तरुणीने. घरची बेताची परिस्थिती, मर्यादित साधने आणि समाजातील आव्हाने, या सर्वांवर मात करत परवीनने केवळ १२ वी उत्तीर्ण असतानाच अडीच वर्षांच्या कठोर परिश्रमानंतर महाराष्ट्र पोलीस दलात 'कॉन्स्टेबल' म्हणून आपली जागा निश्चित केली आहे. नुकताच नागपूर येथे त्यांचा दीक्षांत संचलन सोहळा पार पडला असून, आता त्या मुंबई शहरात आपली सेवा बजावण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. परवीन यांचे १० वी आणि १२ वीचे शिक्षण शिर्डीतील श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयात झाले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. मात्र, हा प्रवास सोपा नव्हता. कौटुंबिक परिस्थिती जेमतेम असतानाही त्यांनी कधीही हार मानली नाही. परवीनचा प्रवास सोपा नव्हता. वय अवघे २२ वर्षे. पदवी नाही, फक्त १२ वी उत्तीर्ण. घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम असताना, पोलीस होण्याचे स्वप्न पाहणे हेच मुळात मोठे धाडस होते. मात्र, परिस्थितीने परवीनला खचवले नाही, तर अधिक मजबूत केले. आपल्या गरिबीला अडसर न मानता, तिने त्यालाच आपली ताकद बनवले आणि खाकी वर्दी

मिळवण्याची जिद्द मनात बाळगली.

प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या मागे कुणाचा तरी हात असतो, परवीनच्या मागे तिचे वडील खंबीरपणे उभे राहिले. तिचे वडीलच तिचे पहिले मार्गदर्शक बनले. अभ्यास कसा करावा, सातत्य कसे ठेवावे, याबाबत त्यांनी परवीनला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. परीक्षेच्या तयारीसाठी परवीनने 'B & W Academy' मध्ये काही काळ मार्गदर्शन घेतले, परंतु अभ्यासाचा मोठा हिस्सा तिने स्वतःहून पूर्ण केला. पोलीस भरतीमध्ये लेखी परीक्षेइतकेच महत्त्व मैदानी चाचणीला असते. अनेकजण यासाठी महागडे क्लासेस आणि प्रशिक्षक लावतात. मात्र, परवीनने अभ्यासाप्रमाणेच मैदानी सराव (Ground Training) देखील पूर्णपणे स्वतःच्या हिमतीवर केला. पहाटे उठून धावणे, व्यायामाचे कठोर वेळापत्रक पाळणे, हे तिने अडीच वर्षे न थकता केले. तिच्या या 'सेल्फ-मेड' तयारीनेच तिला यशाच्या शिखरावर पोहोचवले.

पोलीस भरती प्रक्रिया अत्यंत स्पर्धात्मक आणि थकवणारी असते. अडीच वर्ष सतत प्रयत्न, अपयशाची भीती आणि समाजाच्या नजरा, या सर्व गोष्टींचा सामना करत परवीनने आपले लक्ष ढळू दिले नाही. अखेर तिच्या कष्टाला फळ मिळाले आणि तिची मुंबई शहरात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून निवड झाली. हे केवळ तिचे यश नव्हते, तर तिच्या कुटुंबाच्या कष्टाचे आणि विश्वासाचे चीज होते. निवडीनंतर परवीनने नागपूर येथे ९ महिन्यांचे अत्यंत खडतर असे पोलीस प्रशिक्षण पूर्ण केले. शिस्त, शारीरिक क्षमता आणि कायद्याचे ज्ञान आत्मसात केल्यानंतर, नुकताच त्यांचा दीक्षांत संचलन सोहळा पार पडला. या सोहळ्यात खाकी वर्दीत संचलन करताना परवीनच्या चेहऱ्यावर दिसणारा अभिमान आणि समाधान तिच्या संघर्षाची कहाणी सांगत होता.

परवीन शेख यांचा हा प्रवास केवळ एका नोकरी मिळवण्याचा प्रवास नाही. तो अभावग्रस्त परिस्थितीत जगणाऱ्या, १२ वी नंतर काय करावे या विवंचनेत असणाऱ्या हजारो ग्रामीण आणि शहरी तरुणींसाठी एक मोठा संदेश आहे. जर मनात जिद्द असेल, कुटुंबाचा पाठिंबा असेल आणि स्वतःवर विश्वास असेल, तर कोणतीही परिस्थिती तुम्हाला तुमचे स्वप्न पूर्ण करण्यापासून रोखू शकत नाही, हे परवीनने सिद्ध केले आहे. मुंबई शहर पोलीस दलात रुजू होणाऱ्या या नवीन 'लेडी सिंघम' ला पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!

श्री काळभैरवनाथ यात्रा; परंपरा, श्रद्धा आणि एकोप्याचा उत्सव

वडापुरी : (समर्थ गांवकरी)

वडापुरी गावातील श्री काळभैरवनाथ यात्रा हा केवळ धार्मिक उत्सव नसून गावाच्या एकोप्याचे प्रतीक मानला जातो. श्री मच्छिंद्रनाथ व श्री गोरक्षनाथ यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत हा उत्सव अनेक वर्षांपासून सर्व जाती-धर्मीय ग्रामस्थांच्या सहभागातून साजरा होत आहे.

गुढीपाडव्याच्या दिवशी श्रीनाथ मंदिरात पाडवा वाचनाने उत्सवाची सुरुवात होते. यावेळी ग्रामस्थ एकत्र येऊन पुढील वर्षातील पीक-पाण्याचा आढावा घेतात. तसेच मंदिर परिसरात निशाण उभारण्याची पारंपरिक विधीही मोठ्या उत्साहात पार पडते.

उत्सव काळात दररोज आरती, भजन आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अनेक भाविक गुढीपाडव्यापासून यात्रेपर्यंत उपवास करून भक्तिभावाने सहभागी होतात. यात्रेच्या निमित्ताने गावात एकाच ठिकाणी देणगी गोळा करण्याची परंपरा असून, पंचक्रोशीतील भाविकही श्रद्धेने योगदान देतात.

यात्रेतील मुख्य आकर्षण म्हणजे घोड्यावरून निघणारा छबिना. पारंपरिक वाद्यांच्या गजरात, लेझीम नृत्य आणि गुलाल उधळत 'चांगभलं'च्या जयघोषात मिरवणूक काढली जाते. रात्री श्रीनाथ मंदिरात गुरु-शिष्य भेटीनंतर महाआरती संपन्न होते.

रामनवमी निमित्त हनुमान मंदिरात कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन केले जाते. तसेच यात्रेनिमित्त जंगी कुस्त्यांचे मैदान भरते, ज्यात विविध जिल्ह्यांतील नामांकित मल्ल सहभागी होतात.

नलवडे परिवाराची निशाण चढवण्याची १५० वर्षांची परंपरा, माहेरवाशिणींचा सहभाग, तसेच बाहेरगावी गेलेले ग्रामस्थ यात्रेसाठी गावी परत येणे ही या उत्सवाची वैशिष्ट्ये आहेत.

याशिवाय लोककलेचे जतन करण्यासाठी पारंपरिक तमाशाचे आयोजन केले जाते. अशा विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमुळे श्री काळभैरवनाथ यात्रा वडापुरी गावाच्या ऐक्य आणि संस्कृतीचे जिवंत प्रतीक ठरते.

तरुणांनी राष्ट्रसेवेत योगदान द्यावे : मंजुश्री खर्डेकर

पुणे : (समर्थ गांवकरी)

"भगतसिंह, सुखदेव व राजगुरू यांच्यासह इतर क्रांतिकारकांनी देशासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन राष्ट्रसेवेचे हे व्रत तरुण पिढीने जपावे. सजग, सशक्त व संघटित समाजासाठी तरुणांनी राष्ट्राच्या उभारणीमध्ये चांगले योगदान द्यावे," असे प्रतिपादन ज्येष्ठ नगरसेविका मंजुश्री खर्डेकर यांनी केले. पतित पावन संघटनेच्या वतीने शहीद दिनानिमित्त सरदार भगतसिंह, सुखदेव व राजगुरू या क्रांतिकारकांना अभिवादन करण्यात आले. कर्वे रस्त्यावरील सावरकर स्मारक येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमावेळी पतित पावन संघटनेचे प्रांत सरचिटणीस नितीन सोनटक्के, प्रांत उपाध्यक्ष राजाभाऊ पाटील, पुणे शहराध्यक्ष श्रीकांत शिळीमकर, शहर पालक मनोज नायर, कार्याध्यक्ष गोकुळ शेलार, सरचिटणीस जालिंदर टेमघरे, जिल्हाध्यक्ष सुनील मराठे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ सोनवणे, कोल्हापूर जिल्हा कार्याध्यक्ष काका मोहिते, शहर संपर्कप्रमुख तेजस पाबळे, उपाध्यक्ष निलेश जोशी व प्रशांत कुरुमकर, संघटक विजय गावडे, संघटक शरद देशमुख, संघटक सौरभ कुलकर्णी, कामगार शिक्षण प्रमुख राजाभाऊ बर्गे, सहसंघटक प्रविण ठाकुर, सहसंपर्कप्रमुख राहुल पडवळ, कोथरूड विभाग अध्यक्ष अण्णा बांगर, उपाध्यक्ष विनोद बागल, शिवाजीनगर विभाग अध्यक्ष अक्षय बर्गे आदी उपस्थित होते. नितीन सोनटक्के म्हणाले, "शहीदांच्या बलिदानाचे महत्व तरुणांनी लक्षात घेऊन देशासाठी चांगली सेवा द्यावी. देशातील क्रांतिकारकांच्या वारशाची जपणूक करताना समाजात अधिक संघटनात्मक एकजुट व्हायला हवी. छत्रपती शिवाजी महाराज, भगतसिंह, राजगुरू, सावरकर यांच्या बलिदानातून प्रेरणा घेत आधुनिक काळात युवकांनी जागरूकता आणि संघटित कार्यावर भर द्यावा. समाजातील तणाव टाळण्यासाठी एकता आणि सक्रिय सहभाग आवश्यक आहे."

ओतूर येथील ग्रामीण रुग्णालय एका महिन्यात सुरू करा अन्यथा जेष्ठ नागरिक संघाकडून उपोषणाचा इशारा

ओतूर : (समर्थ गांवकरी)

ओतूर ता. जुन्नर येथील ग्रामीण रुग्णालयाची इमारत तयार होऊन दोन वर्षे उलटून गेली तरीदेखील रूग्णालय उद्घाटनाच्या प्रतीक्षेतच आहे. ते त्वरित सुरू करा अन्यथा ओतूर ज्येष्ठ नागरिक संघाकडून एक मे महाराष्ट्र दिनापासून बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाला निवेदनाद्वारे दिला आहे. ओतूर येथे ग्रामीण रुग्णालय बांधून गेली दोन वर्षे झाली आहेत. सदर रुग्णालयासाठी मशीनरी व इमारतीसाठी अंदाजे पंधरा कोटी रुपये खर्च झाला आहे. सर्व सुविधा असूनही रूग्णालय गेली वर्षभर बंद आहे. ओतूर आणि परिसरात आदिवासी, शेतकरी व ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठी आहे. त्यांना वैद्यकीय उपचारासाठी वेगवेगळया ठिकाणी जावे लागते. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होते. त्याचप्रमाणे कल्याण अहिल्यानगर महामार्ग ओतूर मधून जात असून सदर महामार्गावर वारंवार अपघात होत असतात अशावेळी अपघातातील रुग्णांना तातडीने मदत मिळत नाही. त्यामुळे अनेकांना जीव गमवावे लागले आहेत. सदर रूग्णालय त्वरीत सुरू करणेबाबत जनतेची मागणी आहे. ओतूर ग्रामीण रूग्णालय त्वरीत सुरू करणेबाबत तातडीने कार्यवाही करावी. अन्यथा ज्येष्ठ नागरिकांना नाईलाजास्तव उपोषण करावे लागेल व त्याची सर्व जबाबदारी शासनाची राहील. ओतूर ग्रामीण रूग्णालय एक महिन्यात सुरू झाले नाही, तर १ मे महाराष्ट्र दिनापासून आम्ही आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. निवेदनाची प्रत शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, तहसीलदार जुन्नर, ओतूर पोलिस ठाणे यांना पाठविण्यात आल्याचे जेष्ठ नागरिक संघाकडून सांगण्यात आले.

कॅननचा अव्वल क्रमांक कायम

पुणे : (समर्थ गांवकरी)

कॅनन इंडिया, डिजिटल इमेजिंग सोल्यूशन्समधील अग्रगण्य कंपनीने जाहीर केले आहे की तिने सलग दहाव्या वर्षी आयडीसी वर्ल्डवाइड क्वार्टरली हार्डकॉपी पेरिफेरल्स ट्रॅकर क्यू ४ २०२५च्या अहवालानुसार कलर, मोनो आणि ओव्हरऑल लेझर कॉपियर बेस्ड एमएफपी सेगमेंटमध्ये आपले क्रमांक १ स्थान कायम ठेवले आहे. हा मैलाचा दगड कॅननच्या सातत्यपूर्ण नवकल्पना आणि ग्राहकांना अधिक चांगला अनुभव देण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, ज्यामुळे व्यवसाय अधिक सोपा आणि कार्यक्षम झाला आहे. आयडीसी च्या अहवालानुसार, कॅनन इंडियाने २०२५ मध्ये ३१.९ टक्के मार्केट शेअर मिळवत सर्व सेगमेंटमध्ये क्रमांक १ स्थान मिळवले. हे यश उच्च दर्जाचे, कार्यक्षम आणि एकत्रित प्रिंटिंग सोल्यूशन्सची मागणी पूर्ण करण्यासाठी कंपनीने केलेल्या प्रयत्नांचे फलित आहे.

ईद मिलन कार्यक्रमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

रावेर : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील खिर्डी खुर्द ता. रावेर येथील केळी, कापूस तसेच धान्य व्यापारी शेख इम्रान शेख कमर, यांच्यासह शेख रईस, शेख फारुक, शेख फरीद, शेख इरफान, शेख मोसिम, शेख आमिन यांच्या वतीने ईद मिलन कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात हिंदू-मुस्लिम समुदायातील नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आल्याने सामाजिक सलोखा आणि एकतेचे दर्शन घडून आले. या सोहळ्याला माजी जिप उपाध्यक्ष नंदकिशोर महाराज, भाजप चे युवा जिल्हाध्यक्ष श्रीकांत महाजन, शिवसेनेचे छोटू पाटील, ॲड. संदीप भंगाळे, निंभोरा पोलिस स्टेशनच्या सहायक पोलिस उपनिरीक्षक दिपाली पाटील व त्यांचे सहकारी कर्मचारी, येथील पोलिस पाटील रितेश चौधरी, भास्कर पाटील, खिर्डी खुर्द सरपंच राहुल फालक, सुनील कोल्हे, विनोद पाटील, निळकंठ पाटील, विलास पाटील, हेमंत नेमाडे, दत्तात्रय फालक, राजेंद्र महाजन, हेमंत किरंगे, गोपाल झोपे, किशोर बढे, गुणवंत पाटील, चंद्रकांत कोळी, सतीश फेगडे, जाकिर पिंजारी, अलाताफ बेग, शेख नईम, शेख कय्युम, फारुख शेख, साबीर बेग, जाबीर बेग, अनिस शेख, निसार शेख, रहीम शेख, सुरेश महाजन, सोनू पाटील, अंकित पाटील, धीरज महाजन, हर्षल महाजन, जितेंद्र फालक, भास्कर भंगाळे, प्रवीण भंगाळे, निळकंठ बढे, गिरीश ढाके, संजू किरंगे, दुर्गादास बोंडे, भूषण ढाके, पुर्वेश बढे, गणेश राणे, गणेश देवगिरीकर, नितीन नेहेते, किरण कोळी, सुलतान मण्यार, रवी कोचुरे, कांतिलाल गाढे, भरत लढे, युवराज इंगळे, योगेश कोळंबे, कुंदन झोपे, लोकेश बढे, दत्तात्रय बढे, आकाश चौधरी, शांताराम भंगाळे, यश भंगाळे, केतन भंगाळे, योगेश कोचुरे, संतोष बोरसे, जीवन नेमाडे, जयंत भंगाळे, सादिक शेख, प्रदीप पाटील, गुड्डू भंगाळे, डॉ. सुधीर पाटील, युवराज झांबरे यांच्यासह परिसरातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. या स्नेहमेळाव्यामुळे गावातील बंधुभावाची परंपरा अधिक दृढ झाल्याचे पाहायला मिळाले.

अतिक्रमण विरोधी विभागचे अंबाई हॉटेलला बुलडोझर लावले

आठ दिवसांत आसना ते अर्धापूर तालुक्याची हद्द अतिक्रमण मुक्त करू - राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकारी

अर्धापूर : (समर्थ गांवकरी)

नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील वाढती अपघातांची मालिका व वाहतुकीला अडथळा होवूनये यासाठी राष्ट्रीय महामार्गाच्या प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहीम बुलडोजर लावून सुरू केली आहे. अर्धापूर तालुक्यातील हिंगोली जिल्हा हद्द ते असना नदीपर्यंत राष्ट्रीय मार्गावरील सर्व अतिक्रमणे,अवैध होर्डिंग्ज, पार्किंग व अनधिकृत दुकाने हटवण्यासाठी बुलडोझर लावून अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केली होती. आज अतिक्रमण काढले की उद्या जैसे थे परिस्थिती होत असल्याने राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी फिरते पथक स्थापन करून अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेत आहे. हिवरा पाटीवरील अंबाई फॅमिली हॉटेलला बुलडोझर लावून अतिक्रमण काढले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी अतिक्रमण हटाव विशेष मोहीम हाती घेत पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटाव मोहीम पोलीस बंदोबस्तात सुरू राहणार असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविण्यासाठी

पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी सूचना न देता अंबाई फॅमिली हॉटेलला बुलडोजर लावून मोडतोड करून मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचा आरोप हॉटेलचे मालक माधव गुरुपवार यांनी आमच्या प्रतिनिधीची बोलताना केला आहे.

वनप्लस नॉर्ड बड्स ४ प्रो विक्रीसाठी उपलब्ध

पुणे: (समर्थ गांवकरी)

जागतिक तंत्रज्ञान ब्रँड वनप्लसने आज आपल्या वनप्लस नॉर्ड बड्स ४ प्रो ची विक्री सुरू केली आहे. हे इयरबड्स उत्कृष्ट नॉईज कॅन्सलेशन आणि दमदार बास परवडणाऱ्या किमतीत देतात. यांची किंमत रु. ३, ९९९ असून, मर्यादित कालावधीसाठी विशेष लॉन्च किंमत रु. ३,७९९ठेवण्यात आली आहे. हे इयरबड्स वनप्लस डॉट इन , वनप्लस स्टोअर ॲप, वनप्लस एक्स्पिरियन्स स्टोअर्स, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट आणि मिन्त्रा वर उपलब्ध आहेत. वनप्लस नॉर्ड बड्स ४ प्रो हे लोकप्रिय नॉर्ड बड्स मालिकेतील नवीन इयरबड्स असून, ते ५५ डेसिबलपर्यंत नॉईज कॅन्सलेशन देतात, ज्यामुळे अवांछित आवाज पूर्णपणे ब्लॉक होतो. यात नवीन ड्रायव्हर्स दिले आहेत जे नॉर्ड बड्स ३ प्रो पेक्षा १०० टक्के अधिक शक्तिशाली आहेत.

टेबल पॉईंटवर धोकादायक स्टंट करणाऱ्यावर पोलिसांची कारवाई; चालक ताब्यात

डांग: गुजरात : (समर्थ गांवकरी)



गुजरातमधील प्रसिद्ध हिल स्टेशन सापुतारा येथे पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सापुतारा पोलिसांनी कौतुकास्पद कारवाई केली आहे. सापुतारातील लोकप्रिय पर्यटनस्थळ टेबल पॉईंट (गव्हर्नर हिल) येथे काही युवकांनी उघड्या जीपमधून धोकादायक स्टंट केल्याची घटना समोर आली होती. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर किंवा पोलिसांच्या निदर्शनास आल्यानंतर सापुतारा पोलिसांनी तात्काळ कारवाई केली.

पोलीस ठाण्याचे पी.आय. पी.डी. गोंडल्या आणि त्यांच्या पथकाने संबंधित वाहनचालकाला ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

या कारवाईचा उद्देश पर्यटनस्थळी शिस्त राखणे आणि अपघात टाळणे हा आहे.सापुतारा टेबल पॉईंटसारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी असते, त्यामुळे अशा प्रकारचे स्टंट मोठ्या दुर्घटनेला कारणीभूत ठरू शकतात.या पार्श्वभूमीवर सापुतारा पोलिसांनी नागरिक व पर्यटकांना आवाहन केले आहे की सार्वजनिक ठिकाणी धोकादायक स्टंट करू नयेत आणि कायद्याचे पालन करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

सापुतारा पोलिसांच्या या तत्पर कारवाईचे स्थानिक नागरिक आणि पर्यटकांनी स्वागत केले आहे.

दापका तांडा येथे भव्य धर्मपरिषद

मुखेड : (समर्थ गांवकरी)

- धर्मगुरु बाबुसिंग महाराज यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभणार

तालुक्यातील दापका राजा तांडा येथे दि १ एप्रिल रोजी बंजारा समाजाच्या भजनकरी महाराज,पुजारी,नायक व कारभारी यांची भव्य धर्मपरिषद आयोजित करण्यात आली आहे. येथे होणाया कार्यक्रमाच्या जागेचे भूमिपूजन संत बळीराम महाराज,माजी जिल्हा संघचालक सत्यवानजी गरुडकर,अकोलाचे सदाशिव आप्पा चव्हाण,परभणीचे दशरथजी राठोड,वाशिमचे सुधाकरभाऊ राठोड,ज्येष्ठ पत्रकार शिवाजी कोनापूरे,तालुका कार्यवाह निलेश डांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आले. 1 एप्रिल रोजी धर्मजागरण समन्वय देवगिरी प्रांत आयोजित माता जगदंबा देवी व श्री संत सेवालाल महाराज मंदिर यांच्या कळस स्थापना निमित्य बंजारा समाजाचे भजनकारी महाराज,पुजारी,नायक व कारभारी यांची धर्म परिषद होणार आहे. या वेळी बंजारा समाजाचे धर्मगुरु डॉ.बाबुसिंग महाराज पोहरादेवी,अखिल भारतीय धर्म जागरण प्रमुख शरद ढोले,पदस्थ अखिल भारतीय चैतन्य साधक परिवार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अखिल भारतीय संत समिती, संत नामदेव महाराज दापकेकर,आ.डॉ.तुषार राठोड,मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आवाहन धर्मप्रचारक बंडू महाराज दापकेकर,नायक बालाजी धोंडीराम राठोड,कारभारी उत्तम पवार यांनी केले आहे.

वृत्तपत्र विक्रेत्यांनी घेतला निसर्गाच्या सान्निध्यात आनंद

उत्साहात पार पडली निसर्ग सहल व वनभोजन

नांदेड: (समर्थ गांवकरी)

वर्षभर ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता घराघरांत वृत्तपत्र पोहोचवणाऱ्या "माहिती दूतांनी" अर्थात वृत्तपत्र विक्रेत्यांनी आपल्या परिवारासह दैनंदिन कामाच्या व्यापातून वेळ काढून निसर्गाच्या सान्निध्यात एक दिवस आनंदाने घालवला. निसर्ग सहलीचे हे 2 रे वर्षे होते. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांच्या संकल्पनेतून नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली वार्षिक निसर्ग सहल सीताखंडी येथील आनंदधाम व आनंदवन येथे मोठ्या उत्साहात पार पडली. निसर्ग सहल सकाळी दहा वाजता वृत्तपत्र वितरण सेंटर येथून मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आयटकचे कॉ.ॲड.प्रदिप नागापूरकर व जेष्ठ पत्रकार तथा पुण्यनगरी चे उपसंपादक कृष्णा उमरीकर, वितरण प्रतिनिधी गणपत बनसोडे, गणेश वडगावकर हे उपस्थित होते. वृत्तपत्र विक्रेत्यांचे जीवन अत्यंत कष्टाचे असते. पहाटे लवकर उठून कामाला सुरुवात केल्यामुळे त्यांना कुटुंबासोबत किंवा वैयक्तिक छंदांसाठी वेळ मिळणे कठीण होते. हाच मानसिक ताण हलका व्हावा आणि सर्व विक्रेता बांधवांमध्ये स्नेह वाढावा तसेच सोबत "एक दिवस आनंदासाठी" या उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सहलीच्या ठिकाणी विक्रेत्यांनी निसर्गाचा आनंद लुटला, जंगलातून पायी जंगल सफारी केली. तसेच महिला , पुरूष व लहान मुले यांनी लिंबू-चमचाचा खेळ खेळला, गाण्याच्या भेंड्या, बोध कथा, मनोगत अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, त्यात सर्वांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. महिला सदस्यांनी यावेळी बालपण आठवल्याचे सांगितले. यावेळी डॉ बालाजी कोम्पलवार यांनी अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. राज्य संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांनी संघटनेच्या आजपर्यंत केलेल्या कामासह वेगवेगळ्या विषयांवर मत मांडले. तसेच जेष्ठ वृत्तपत्र विक्रेते सरदारसिंह चव्हाण, तामस्याचे देवबा डोरले, बालाजी चंदेल, अनूप ठाकूर, बालाजी सुताडे, गजानन पवार, दिपक तिडके, विठ्ठल फडेवार, शंकर वंगलवार, यांनीही मनोगत व्यक्त केले. निसर्गाच्या सान्निध्यात गोरे यांनी तिथेच तयार केलेल्या चवदार भोजनाचा आनंद घेतला. याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत घाटोळ, उपाध्यक्ष सतीश कदम, सहसचिव भागवत गायकवाडांसह मोठ्या संख्येने वृत्तपत्र विक्रेते बांधव उपस्थित होते. "अशा उपक्रमांमुळे कामाचा थकवा दूर होऊन पुन्हा जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळते," अशी भावना यावेळी उपस्थित विक्रेत्यांनी व्यक्त केली. संध्याकाळी अंदाजे सात वाजता अत्यंत आनंदी वातावरणात या सहलीचा परतीचा प्रवास सुरू झाला. संदीप कटकमवार यांनी निसर्ग सहलीला सहकार्य केलेल्या व सहभागी झालेल्या सर्व सदस्यांचे अभिनंदन करून आभार मानले.

३१ मार्च अखेर वसुलीचा ताण

केडरमध्ये समावेश, बदल्या व कर्जमाफीच्या धोरणावरून सहकारी सोसायट्यांत संताप!

सहकारी सोसायट्या या गावाच्या स्वाभिमानाशी जोडलेल्या संस्था असून त्यांचा कारभार पारदर्शक राहणे आवश्यक आहे. केडरमध्ये समाविष्ट झाल्यानंतर सचिवांनी वरिष्ठ-कनिष्ठ यांचा मान राखावा, गटबाजी टाळावी आणि वसुलीबरोबरच शेतकऱ्यांचा विश्वास टिकवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्हा बँकेनेही केवळ वसुलीसाठी सोसायट्यांचा वापर न करता त्यांच्या कामकाजावर नियमित अंकुश ठेवण्याची मागणी जोर धरत आहे.

डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यात ३१ मार्च अखेर जवळ आल्याने सहकारी संस्था व जिल्हा बँकांकडून कर्जवसुलीची मोहीम वेगाने सुरू झाली आहे. वर्षअखेर असल्यामुळे विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांवर वसुलीचे मोठे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यासाठी वसुली पथके गावागावांत रवाना होत आहेत. मात्र दुसरीकडे कर्जमाफी, प्रोत्साहनपर योजना आणि सचिवांच्या केडर समावेशाच्या निर्णयांमुळे शेतकरी व सोसायटी पातळीवर नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पूर्वी "सातबारा कोरा करू" अशा आश्वासनांमुळे अनेक शेतकऱ्यांनी कर्जफेड थांबवली. नंतर नियमित कर्जदारांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांची सन्मान योजना देण्यात आली, तर थकीत कर्जदारांना कर्जमाफीचा लाभ मिळाल्याने नियमित कर्ज भरणाऱ्यांमध्ये असंतोष वाढला. त्यामुळे आता वसुलीसाठी दबाव येताच संतप्त शेतकऱ्यांनी विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांच्या सचिवांना धारेवर धरल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे. "कर्ज भरा, कर्जमाफी मिळेल" अशा दिलेल्या आश्वासनांमुळे बळीराजामध्ये संभ्रम निर्माण झाल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, अनेक सचिवांना केडरमध्ये समाविष्ट केल्याने त्यांच्यात समाधानाचे वातावरण आहे. संस्थानिहाय काम करताना संचालक मंडळाकडून पगार, वसुलीचा दबाव आणि स्थानिक राजकारण यामुळे सचिवांची मोठी कोंडी होत होती. आता केडरमध्ये समावेश झाल्यानंतर वेतन थेट जमा होणार असल्याने सचिवांमध्ये उत्साह आहे. वसुलीनंतर प्रथम केडर, त्यानंतर बँक आणि नंतर संस्था पातळीवर कारवाई अशी नवी कार्यपद्धती राबवली जाणार असल्याचे सांगितले जात आहे.

अकोले तालुका केडर संघटनेमार्फत अनेक मोठ्या संस्थांवर नव्या सचिवांना संधी देण्यात आली आहे. कोतुळ सोसायटीवर नवनाथ चौधरी यांना संधी मिळाल्याची चर्चा असून शेलद विविध कार्यकारी सोसायटी, कोतुळ विविध कार्यकारी सोसायटीसह तालुक्यातील अनेक संस्थांमध्ये केडरमधील सचिवांची नियुक्ती करण्यात आली आहे. नव्याने संधी मिळालेल्या सचिवांनी वसुली वाढवून संस्थांना सक्षम करण्याचे आव्हान स्वीकारले आहे.

मात्र या प्रक्रियेत जुन्या सचिवांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त होत आहे. २०१२ पासून कार्यरत असलेल्या काही सचिवांना अद्याप केडरमध्ये समावेश नाही, तर २०१७ नंतर नियुक्त झालेल्यांना थेट समावेश मिळाल्याने नाराजी वाढली आहे. वरिष्ठ व कनिष्ठ सचिवांमध्ये संवादाचा अभाव, गटबाजी आणि अंतर्गत राजकारणामुळे वसुलीवर परिणाम होत असल्याचेही सांगितले जाते.

जिल्हा सहकारी बँकेने आता वसुलीसाठी हजेरी मस्टर व थम्ब प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. सचिवांच्या बदल्या केवळ तालुक्यात मर्यादित न ठेवता जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमध्ये करण्याची मागणी जोर धरत आहे. कर्जत, जामखेड, श्रीगोंदा, पारनेर येथील सचिवांना अकोले तालुक्यात काम करण्याची इच्छा आहे, तर अकोलेतील सचिवांनाही इतर तालुक्यांत संधी मिळावी अशी मागणी होत आहे. जिल्हास्तरावर बदल्या झाल्यास स्थानिक पातळीवरील दबाव व भ्रष्टाचाराला आळा बसेल, असा दावा केला जात आहे.

यापूर्वी काही संस्थांमध्ये गैरव्यवहार उघड झाल्यानंतर सचिवांची बदली इतर तालुक्यांत करण्यात आली होती. मात्र काही काळानंतर ते पुन्हा मूळ तालुक्यात परत आल्याने प्रश्न कायम राहिल्याची चर्चा आहे. त्यामुळे जिल्हा सहकारी बँकेने बदल्या पारदर्शक पद्धतीने करण्याची गरज व्यक्त होत आहे.

मार्च महिन्यात जिल्हा बँकेचे अधिकारी तालुकानिहाय बैठक घेऊन वसुलीचे उद्दिष्ट देतात. बँक पातळीवर वसुली झाली की पुढील जबाबदारी संस्था पातळीवर ढकलली जाते. अनेक संस्था तोट्यात जात असल्याने त्यांच्या कारभारावर लक्ष ठेवण्याची मागणी होत आहे. नव्या सचिवांना जबाबदारी देताना अनुभवी सचिवांना मार्गदर्शक म्हणून ठेवावे, अशीही मागणी पुढे आली आहे.

हायब इंडिया तर्फे पुढील पिढीतील जागतिक ताऱ्यांच्या शोधासाठी ऑडिशन्सची घोषणा

पुणे : (समर्थ गांवकरी)

हायब इंडियाने आज हायब इंडिया ऑडिशनची घोषणा केली. यामुळे हायबने भारताच्या टॅलेंट इकोसिस्टममध्ये अधिकृत प्रवेश केला असून जागतिक कलाकार शोध मोहिमेचा विस्तार करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.हायबच्या 'मल्टी-होम, मल्टी-जनर' या जागतिक यशस्वी धोरणाचा भाग म्हणून हायब इंडिया भारतासाठी स्थानिक पातळीवर कलाकार विकासाची पद्धत आणणार आहे. बीटीएस सारखे २१व्या शतकातील पॉप आयकॉन आणि जागतिक गर्ल ग्रुप कॅटसाई घडविण्याचा वारसा असलेल्या कंपनीने आता भारताकडे लक्ष केंद्रित केले आहे, जेणेकरून पुढच्या पिढीतील ग्लोबल स्टार्स शोधता येतील. हायब इंडिया ऑडिशनचा उद्देश भारतातील आणि भारतीय डायस्पोरामधील उदयोन्मुख संगीत प्रतिभा शोधणे

आहे. निवडलेल्या उमेदवारांना हायबच्या वर्ल्ड-क्लास ट्रेनिंग आणि प्रॉडक्शन इकोसिस्टममध्ये प्रवेश मिळणार आहे.

क्रिएटिव्ह डेव्हलपमेंट, परफॉर्मन्स ट्रेनिंग आणि ग्लोबल स्टोरीटेलिंग यांचा संगम घडवून हा कार्यक्रम अशा कलाकारांना घडवेल जे भारताचे प्रतिनिधित्व जागतिक मंचावर करू शकतील. या उपक्रमाच्या केंद्रस्थानी हायब इंडियाचा भारतीय तरुणांवरील विश्वास आहे. स्थानिक प्रतिभेला जागतिक कौशल्यासोबत जोडून भारतीय संगीत आणि मनोरंजन क्षेत्रातील पुढची पिढी घडविण्याचे हे ध्येय आहे. हायबच्या व्यापक दृष्टिकोनाचा भाग म्हणून जगभरातील कलाकारांना जागतिक उत्कृष्टतेकडे नेण्याचा हा प्रयत्न आहे. ऑडिशनचा लॉन्च व्हिडिओ आणि अधिकृत पोस्टर या प्रवासाचे दर्शन घडवतात आणि जागतिक मंचावर पाऊल ठेवण्याचे दमदार आवाहन करतात. ऑडिशन ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून घेण्यात येणार आहे. अहमदाबाद, बेंगळुरू, चंदीगड, चेन्नई, दिल्ली, गुवाहाटी, हैदराबाद, कोलकाता, मुंबई आणि पुणे या प्रमुख शहरांमध्ये प्रत्यक्ष ऑडिशन आयोजित केले जातील. या ऑडिशनचे सादरीकरण एच अँड एम, शॉपर्स स्टॉप, सॅमसंग आणि नॉन्गशिम सारख्या जागतिक व राष्ट्रीय ब्रँड्सच्या सहकार्याने होणार आहे.

आळेफाटा आणि पंचक्रोशी परिसर झाला भगवामय

आळे : (समर्थ गांवकरी)

आळे येथे रविवारी (दि. २२)रोजी सायं ६ वाजता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेले विराट हिंदू महासंमेलन मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडले. या संमेलनासाठी आळेफाटा व पंचक्रोशी परिसरातील सुमारे ५ ते ७ हजार नागरिकांचा जनसमुदाय उपस्थित होता. संमेलनानिमित्त आळेफाटा येथून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत महिलांचे लेझीम पथक, झांज पथक, बाल वारकऱ्यांची दिंडी यांचा सहभाग होता. तसेच प्रभू श्रीरामांचा जिवंत देखावा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा जिवंत देखावा हे शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले. शोभायात्रेमुळे संपूर्ण आळेफाटा व परिसर भगवामय झाला होता.

राज्य अजिंक्यपद कबड्डीचा थरार, स्पर्धेचे थेट प्रक्षेपण 'स्पोर्टवोट' वर

पुणे : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राच्या मातीतील अस्सल खेळ आणि क्रीडा शौकिनांच्या गळ्यातील ताईत असलेल्या वरिष्ठ गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचा (शिवचषक) बिगुल वाजला आहे. येत्या २ ते ६ एप्रिल २०२६ या कालावधीत नाशिकमधील सिन्नर येथील 'नमो क्रीडा नगरी' (आडवा पट्टा) येथे ही ७३ वी पुरुष व महिला गट स्पर्धा रंगणार आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, नाशिक जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि सह्याद्री युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे सलग तिसऱ्या वर्षी जागतिक स्तरावर 'एक्सक्लुझिव्ह' थेट प्रक्षेपण करण्याचे हक्क 'स्पोर्टवोट' या डिजिटल प्लॅटफॉर्मने पटकावले आहेत. यामुळे जगभरातील कबड्डी प्रेमींना घरबसल्या या हाय-व्होल्टेज स्पर्धेचा आनंद घेता येणार आहे.

यावेळच्या स्पर्धेचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रो-कबड्डी लीगमध्ये आपल्या खेळाची छाप पाडणाऱ्या दिग्गज खेळाडूंची मांदियाळी. नाशिकचा आकाश शिंदे (बेंगळुरू बुल्स), पुण्याचे अजित चव्हाण (यु मुंबा) व तेजस पाटील (हरियाणा स्टीलर्स), अहमदनगरचा आदित्य शिंदे (पुणेरी पलटण) आणि कोल्हापूरचा दादासो पुजारी (पुणेरी पलटण) यांसारखे स्टार खेळाडू आपापल्या जिल्हा संघांचे प्रतिनिधित्व करताना दिसतील. त्यांच्या सहभागामुळे स्पर्धेतील चुरस आणि तांत्रिक दर्जा कमालीचा उंचावणार आहे.

राज्य अजिंक्यपद स्पर्धा हा भारतीय कबड्डीचा कणा आहे. ग्रामीण भागातील कच्च्या हिऱ्यांना आणि अनुभवी प्रो-खेळाडूंना एकाच व्यासपीठावर आणून त्यांना जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे असे 'स्पोर्टवोट'चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धांत अगरवाल यांनी या भागीदारीबद्दल बोलताना सांगितले. " राज्य कबड्डी असोसिएशनच्या प्रवक्त्यांनीही या उपक्रमाचे स्वागत करताना नमूद केले की, गेल्या तीन वर्षांपासून स्पोर्टवोटसोबत असलेल्या या प्रवासामुळे कबड्डी खेळाचा प्रसार तळागाळातील चाहत्यांपर्यंत पोहोचण्यास मोठी मदत झाली आहे. ५ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत अनुभवाची शिदोरी असलेले प्रो-खेळाडू आणि जिद्दीने खेळणारे नवोदित खेळाडू यांच्यात काट्याची टक्कर पाहायला मिळेल. हे सर्व सामने 'स्पोर्टवोट' ॲपवर थेट पाहता येतील.

'ऐ अजनबी'ने कोक स्टुडिओ भारत सीझन ४ ला दमदार सुरुवात

राष्ट्रीय : (समर्थ गांवकरी)

भारतीय संगीताच्या वैविध्यपूर्ण परंपरेला उजाळा देणाऱ्या कोक स्टुडिओ भारतने 'ऐ अजनबी' या नव्या गाण्यासह सीझन ४ ची सुरुवात केली आहे. आदित्य रिखारी, कुतले खान आणि रॅवॅटर यांच्या सहयोगातून साकारलेले हे गाणे 'ओढ' या कालातीत भावनेवर आधारित आहे.

'ऐ अजनबी' हे गाणे प्रेमातील ओढ, अपूर्णता आणि व्यक्त न होणाऱ्या भावनांचा प्रवास उलगडते. पत्रांमधील प्रेमापासून ते आजच्या डिजिटल मेसेजेसपर्यंतच्या काळाचा सेतू बांधत, हे गाणे भूतकाळ आणि वर्तमान यांना एकत्र आणते.

संगीताच्या दृष्टीनेही या गाण्यात लोकसंगीत आणि समकालीन पॉपचा सुरेख मिलाफ पाहायला मिळतो. आदित्य रिखारी यांचा मधुर आवाज, कुतले खान यांची पारंपरिक शैली आणि रॅवॅटर यांची आधुनिक संगीत निर्मिती यामुळे

हे गाणे वेगळेपणाने उठून दिसते. कोका-कोला इंडिया व साउथवेस्ट एशियाचे आयएमएक्स प्रमुख शंतनू गंगाणे म्हणाले की, "आजचे श्रोते विविध संगीतप्रकारांचा आनंद घेत आहेत. 'ऐ अजनबी'द्वारे आम्ही पिढ्या, संस्कृती आणि संगीताचा संगम साधला आहे." गाण्याबाबत आदित्य रिखारी म्हणाले, "हे गाणे प्रत्येकाने अनुभवलेल्या ओढीच्या भावनेला स्पर्श करते. त्या भावनेला शब्दांत मांडण्याऐवजी ती जशी आहे तशीच मांडण्याचा प्रयत्न केला आहे."

कुतले खान यांनी सांगितले की, "लोकसंगीत नेहमीच ओढीची कथा सांगत आले आहे. या गाण्यात आम्ही जुन्या भावनेला नव्या आवाजात व्यक्त केले आहे."

तर रॅवॅटर म्हणाले, "या गाण्यातील मूळ भावना जपणे हेच आमचे उद्दिष्ट होते. आदित्य आणि कुतले खान यांच्या भावनेला योग्य संगीत देण्याचा प्रयत्न केला."

'ऐ अजनबी' सह कोक स्टुडिओ भारत सीझन ४ ची सुरुवात झाली असून, आगामी काळातही विविध शैलीतील गाण्यांद्वारे श्रोत्यांना नवा संगीत अनुभव देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

महिला व अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटना चिंताजनक

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्याकडून संसदेत मुद्दा उपस्थित; मानवी तस्करी रोखण्यासाठी तातडीने उपाययोजनांची मागणी

पुणे: (समर्थ गांवकरी)

राज्यात महिला आणि अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटना चिंताजनक असून, याबाबत तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांनी संसदेत मंगळवारी केली. 'झीरो अवर'मध्ये वाढत्या मानवी तस्करीबाबत मेधा कुलकर्णी यांनी प्रश्न उपस्थित करीत या घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे नमूद केले. सरकारने या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देऊन प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, जेणेकरून महिला व अल्पवयीन मुलींची सुरक्षितता सुनिश्चित होईल, असे त्यांनी म्हटले.

आपल्या निवेदनात प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "या समस्येचे स्वरूप अत्यंत चिंताजनक असून, गृह विभागाच्या आकडेवारीनुसार

२०२४ आणि २०२५ या दोन वर्षांत तब्बल ९३ हजार ९४० महिला व मुली बेपत्ता झाल्या आहेत. यापैकी २३ हजारांहून अधिक अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. दररोज सरासरी १३२ महिला बेपत्ता होत असल्याचे आढळले आहे. मुंबई, रायगड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई यांसह पुण्यातही अशा घटनांचे प्रमाण वाढले आहे. पुण्यातच गेल्या १५ दिवसांत १३ ते १७ वयोगटातील २० अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणांमध्ये मानवी तस्करीच्या संघटित जाळ्यांचा सहभाग असण्याची शक्यता आहे. जबरदस्तीने पळवून नेणे, खोट्या प्रेमसंबंधांच्या माध्यमातून फसवणूक, तसेच सोशल मीडियाचा गैरवापर यांसारख्या बाबीही पुढे येत असल्याचे निरीक्षण गृहविभागाने नोंदवले आहे."

तपास आणि शोधकार्याचा वेग अत्यंत कमी असल्याचे सांगून प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, २०२४ मधील ४५ हजार प्रकरणांपैकी १५ हजार प्रकरणांमध्ये अद्याप कोणताही ठोस मागोवा लागलेला नाही. २०२५ मधील ४८ हजार प्रकरणांपैकी १३ हजार महिला अद्याप सापडलेल्या नाहीत. म्हणजेच, गेल्या दोन वर्षांत सुमारे २८ हजार महिला व मुलींचा अद्याप शोध लागलेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. बेपत्ता झालेल्या महिलांचे भवितव्य काय, त्यांची तस्करी झाली का, त्यांना परदेशात विकले गेले का, किंवा त्यांच्यावर अत्याचार झाला का, असे गंभीर प्रश्न त्यांनी उपस्थित केले.

या समस्येवर उपाय म्हणून काही ठोस मागण्या मांडण्यात आल्या. यामध्ये 'गोल्डन अवर्स'मध्ये त्वरित शोध घेण्यासाठी आधुनिक व जलद तपास यंत्रणा उभारणे, मोबाईल ट्रॅकिंग प्रणाली अधिक सक्षम करणे, सार्वजनिक ठिकाणी कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे व त्यांचे सतत निरीक्षण करणे यांचा समावेश आहे. तसेच, जबरदस्ती धर्मांतर आणि विवाहाच्या प्रकरणांवर कठोर कारवाई, अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण, तसेच प्रवास आणि हॉटेलमध्ये ओळखपत्र अनिवार्य करण्याची मागणी त्यांनी केली. राज्यातील टोल नाक्यांवर डिजिटल पेमेंट व ओळख प्रणाली अधिक सक्षम करण्याचीही आवश्यकता असल्याचे त्या म्हणाल्या.

संतांनी मराठी भाषेला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली

वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)

संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान साध्या सोप्या व सरळ भाषेत लोकांना सांगण्यासाठी श्री ग्रंथ ज्ञानेश्वरी ची निर्मिती करून जगाला मोठे तत्त्वज्ञान दिले संत एकनाथ महाराजांनी आपल्या भारुड गवळणी द्वारे आध्यात्मिक उपदेश व प्रबोधन आपल्या संत साहित्यातून समाजाला दिले सर्वच संतांनी मराठी भाषेसाठी आपले योगदान दिले आहे आणि मराठी भाषेला मोठी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे असे प्रतिपादन कवी बाबासाहेब पवार यांनी केले तरवडी येथे सुसंकल्प साहित्यिक व सामाजिक संघटना यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते या संमेलनाचे स्वागत बेनझीर शेख तर प्रास्ताविक संमेलनाचे संयोजक साहित्यिक सायमन भारस्कर यांनी केले उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून संमेलनास प्रारंभ झाला सर्व पाहुण्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला कवी बाबासाहेब पवार म्हणाले समाजातील विषमता दूर करण्याचे काम संत साहित्याने केले आहे सर्व एक समान आहोत कुणी उच नीच नाही सर्व ईश्वराची लेकरे आहेत सायमन भारस्कर यांनी तरवडी सारख्या खेडे गावात साहित्य संमेलन घेऊन खऱ्या अर्थाने नव साहित्यिकांना व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम केले आहे असे ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे माजी चेअरमन देसाई आबा देशमुख म्हणाले परिस्थितीशी झुंज देऊन व संघर्ष करत जी माणसे उभी राहतात ती खरी समाजाचा आदर्श ठरतात असे मत कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष कवी संजय फंड यांनी मांडले याप्रसंगी गिरीश राजूरकर बांगर सर भाऊसाहेब सावंत अब्दुल भाई शेख आदींनी आपले विचार व्यक्त केले.

सेप्ट युनिव्हर्सिटी कडून मास्टर्स इन अर्बन प्लॅनिंग अभ्यासक्रमासाठी अर्ज आमंत्रित

अर्ज स्वीकारण्याची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत

पुणे : (समर्थ गांवकरी)

सेप्ट युनिव्हर्सिटी च्या नियोजन विद्याशाखेमार्फत उपलब्ध असलेल्या 'मास्टर इन अर्बन प्लॅनिंग' (एमयुपी) या दोन वर्षांच्या, पूर्ण-वेळ पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. शहरीकरणाच्या वाढत्या गुंतागुंतीला सामोरे जाण्यासाठी या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली असून यामध्ये शहरी विकास, सार्वजनिक धोरण आणि नियोजनाच्या पद्धती यासाठी चिकित्सकपणे सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी होते.अर्ज स्वीकारण्याची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत आहे.

ज्या व्यक्तींना शहरे कशी कार्य करतात हे समजून घेण्याची आणि अधिक समावेशक, शाश्वत व लवचिक शहरी भविष्य घडवण्याची तीव्र इच्छा आहे, त्यांच्या दृष्टीने एमयूपी आहे. वास्तविक शहरी आव्हानांमध्ये सहभागी व्हायचे आहे, सार्वजनिक धोरण आणि विकासाच्या निर्णयांवर प्रभाव टाकायचा आहे आणि विशेषतः भारतीय शहरांच्या संदर्भात सर्वांसाठी अधिक चांगली घडविण्यासाठी ज्यांना अर्थपूर्ण योगदान द्यायचे आहे, अशा व्यक्तींसाठी हा सुयोग्य ठरणारा आहे. विद्यार्थ्यांना भू-स्थानिक (जिओ-स्पॅटिअल) विश्लेषण, संस्थात्मक आणि धोरणात्मक विश्लेषण, परिदृश्य निर्मिती, नियोजनाची तत्त्वे आणि पद्धती, तसेच प्रभावी व्यावसायिक संवाद कौशल्यांमध्ये भक्कम पाया प्रदान करण्याच्या उद्देशाने सुसज्ज करण्यासाठी मास्टर्स इन अर्बन प्लॅनिंग ((एमयुपी) कार्यक्रमाची रचना केली आहे. स्टुडिओ-आधारित शिक्षण हा या अभ्यासक्रमाचा गाभा आहे. त्याला संकल्पनात्मक, विश्लेषणात्मक आणि पद्धतशीर सखोलता निर्माण करणाऱ्या सैद्धांतिक अभ्यासक्रमांचा आधार लाभला आहे. तसेच आर्थिक साक्षरता, प्रशासकीय चौकट आणि दृकश्राव्य संवाद यांवरही समान भर देण्यात आला आहे.

एमयूपी कार्यक्रमाचे पदवीधर सखोल संस्थात्मक जाणीव आणि व्यावसायिक क्षमता यांचा सामाजिक आणि पर्यावरणीय संवेदनशीलतेसह यांचा मेळ घालणारे नगर नियोजक (अर्बन प्लॅनर्स) म्हणून आपली कारकीर्द घडवतात. खाजगी आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील सल्लागार, सरकारी विभाग आणि संस्था, शहर नियोजन आणि शहरी विकास प्राधिकरणे, सार्वजनिक गृहनिर्माण संस्था, अनौपचारिक वस्त्यांसाठी काम करणाऱ्या गैर-सरकारी संस्था, खाजगी स्थावर मालमत्ता संस्था, संशोधन संस्था, शैक्षणिक संस्था आणि थिंक टँक्स यांसारख्या विविध पदांसाठी तरुण व्यावसायिकांची तयारी करून घेण्यावर या अभ्यासक्रमाचा भर आहे. गेट परीक्षेत वैध गुण असलेले उमेदवार या कार्यक्रमाच्या आवश्यकतेनुसार अर्ज करू शकतात. ज्या अर्जदारांनी 'गेट २०२६' परीक्षा दिलेली नाही किंवा ज्यांच्याकडे पात्रतेसाठीचे गुण नाहीत, त्यांच्यासाठी सेप्ट युनिव्हर्सिटी ने एक पर्यायी मार्ग म्हणून सेप्ट पीजी टेस्ट उपलब्ध करून दिली आहे. ही परीक्षा ऑनलाइन घेण्यात येईल आणि दूरस्थपणे देता येईल. त्यामुळे सर्व भौगोलिक ठिकाणांमधील उमेदवारांना ती सहज उपलब्ध होईल.